
# संवाद येशूबरोबर

डॉ. रंजन केळकर



# संवाद येशूबरोबर

लेखक - डॉ. रंजन केळकर

© Copyright 2015 सर्व हक्क स्वाधीन

Email r.r.kelkar@gmail.com

•

डॉ. रंजन केळकर भारतीय हवामानशास्त्र विभागाच्या महासंचालक पदावरून २००३ साली निवृत्त झाले. त्यानंतर काही वर्षे ते पुणे विद्यापीठातील इसरो अध्यासनाचे मानद प्राध्यापक होते. *Satellite Meteorology, Monsoon Prediction*, *Climate Change A Holistic View*, *Bible Meteorology* (E-book) आणि *चिंतन ३६५ दिवसांसाठी,* ही त्यांची पुस्तके ह्याआधी प्रकाशित झालेली आहेत.

•

मुखपृष्ठ चित्र - संजय उजगरे

•

ह्या पुस्तकात रत्नाकर हरी केळकर ह्यांनी केलेले
नव्या कराराचे मराठी भाषांतर वापरलेले आहे

# प्रस्तावना

**संवाद** म्हणजे केवळ दोन व्यक्तींमधील संभाषण नाही. संवाद म्हणजे घरगुती गप्पा नाहीत. संवाद म्हणजे वेळ घालवण्यासाठी केलेली निरर्थक चर्चा नाही.

संवादाचा प्रमुख हेतू असतो विचारांची देवाणघेवाण करणे, एकमेकांना समजून घेणे. संवादात प्रश्न विचारायची मुभा असते, उत्तरे शोधायचा प्रयत्न केला जातो. संवादामुळे दुरावा कमी होतो. संवाद फक्त दोन व्यक्तींमध्येच होतो असे नाही. तो दोन समाजांत, दोन राष्ट्रांत, परमेश्वर आणि मानव ह्यांच्यांतही होऊ शकतो.

परमेश्वराने मानव निर्माण केला तेव्हापासून मानवाशी संवाद साधण्याची त्याची निरंतर इच्छा आहे. मानवानेसुद्धा परमेश्वराचा सतत शोध घेतलेला आहे. पण अदृश्य परमेश्वर आणि अपूर्ण मानव ह्यांच्यांतला संवाद सहजपणे साध्य होत नाही.

परमेश्वराविषयी आपण थोडासा जरी विचार केला तरी आपल्या मनात अनेक मूलभूत प्रश्न उद्‌भवतात. आणि आपण जितका खोलवर विचार करतो तितके जास्त प्रश्न मनात येतात. हे प्रश्न आपण कोणाला विचारायचे? त्यांची उत्तरे कुठे शोधायची?

पवित्र शास्त्र हे ज्ञानाचे भांडार आहे. ते आपण वाचले तर हे सहज लक्षात येते की, आपल्या मनातील प्रश्न काही नवीन नाहीत. दोन हजार वर्षांपूर्वी तेच प्रश्न दुसऱ्या कोणी तरी प्रभू येशू ख्रिस्ताला विचारले होते आणि त्यांची उत्तरे त्याने दिली होती.

पवित्र शास्त्रात प्रभू येशू ख्रिस्ताने दिलेले एकच मोठे प्रवचन वाचायला मिळते. त्याला डोंगरावरील प्रवचन असे म्हटले जाते. कारण ते ऐकायला लोक इतक्या मोठ्या संख्येने आले की, येशूला एका डोंगरावर चढून जाऊन त्यांच्याशी बोलावे लागले होते. पण येशू एक चांगला शिक्षक असला तरी तो मुळात एक प्रवचनकार नव्हता. लोकांना एकतर्फी भाषणे द्यायची त्याची पद्धत नव्हती. तो पायी चालत असे, गावोगावी फिरत असे, सामान्य लोकांमध्ये वावरत असे, त्यांची सुखदुःखे अनुभवीत असे. तो देवाचा पुत्र असूनसुद्धा स्वतःला मनुष्याचा पुत्र म्हणत असे.

येशू यहुदी लोकांच्या मंदिरात नियमितपणे जात असे आणि तेथे जमलेल्या उपासकांना शास्त्रवचने समजावून सांगत असे. येशूच्या सभोवती नेहमी मोठमोठे लोकसमुदाय असायचे. कितीतरी लोक त्याच्या मागोमाग दूरवर चालत जायचे. अशा लोकांना तो सोपे दाखले सांगून देवाच्या राज्याविषयी शिकवत असे. काही लोक येशूकडे आपल्या वैयक्तिक समस्या घेऊन यायचे. कधीकधी येशू स्वतःहून लोकांची विचारपूस करायचा.

सामान्य यहुदी लोकांव्यतिरिक्त विद्वान शास्त्री आणि धर्माचरण काटेकोरपणे पाळणारे परोशी हेही तात्विक चर्चा करायला येशूकडे वारंवार यायचे. पण त्यांचा हेतू प्रामाणिक नसायचा. ते येशूला वादविवादात गुंतवून त्याच्याच शब्दांत त्याला धरायचा प्रयत्न करीत. येशूला हे माहीत होते. त्यामुळे तो त्यांच्याशी मोजक्याच शब्दांत बोलत असे. कधी कधी तो त्यांना परिचित असलेल्या शास्त्रवचनांची आठवण करून देत असे. किंवा काही प्रतिप्रश्न विचारून त्यांना तो निरुत्तर करत असे.

येशूने निवडलेले बारा शिष्य नेहमीच त्याच्याबरोबर असत. त्यांच्यांत गुरूशिष्यांतले जवळचे नाते होते. अनेकदा येशू त्यांना इतर लोकांपासून दूर नेऊन विशेष बोध करायचा.

पवित्र शास्त्रात नमूद केलेले प्रभू येशूचे निवडक संवाद मी ह्या पुस्तकात सादर केले आहेत. पण पवित्र शास्त्रातील संबंधित उताऱ्यांचा हा केवळ एक संग्रह नाही. प्रत्येक संवादाची पार्श्वभूमी कोणती होती, त्याचा संदर्भ काय होता, आणि आज त्याचा संदेश काय आहे, हेही वाचकांना सांगण्याचा मी प्रयत्न केला आहे.

दोन हजार वर्षांपूर्वीचे हे संवाद वाचताना त्यावेळची परिस्थिती आपण आपल्या डोळ्यांपुढे उभी करायची गरज आहे. त्या ठिकाणी आपण उपस्थित असून त्या संवादात आपण सहभागी होत आहोत अशी कल्पना आपण केली पाहिजे. प्रभू येशूच्या आवाजाकडे आपण आपले कान लावले पाहिजेत. तो स्वतः आपल्याला काही समजावून सांगत आहे, असे आपल्या मनाला वाटले पाहिजे. मग येशूबरोबरच्या आपल्या संवादाला एक जिवंतपणा येईल. पुस्तकातला संवाद संपला तरी आपल्याला येशूबरोबर आणखी बोलत राहावेसे वाटेल. तो आपल्या प्रश्नांची उत्तरे देईल. मग येशू आपला मित्र, मार्गदर्शक आणि उद्धारक आहे ह्याची खरी जाणीव आपल्याला होईल.

मी लिखाण करत असताना परमेश्वराचा आशीर्वाद मला सतत मिळत राहिला. त्याचे उपकारस्मरण करत मी हे ई-पुस्तक वाचकांना सादर करत आहे.

पुणे, ९ मे २०१५ — रंजन केळकर

# *मुखपृष्ठाविषयी*

**माझ्या** ह्या पुस्तकाचे मुखपृष्ठ चित्रकार आणि आर्किटेक्ट संजय उजगरे ह्यांनी रंगवले आहे. त्यासाठी मी त्यांचा ऋणी आहे. चित्र साधे वाटत असले तरी त्यामागची संकल्पना प्रगल्भ आहे.

येशूला ज्या वधस्तंभावर खिळले गेले त्याच्या दोन बाजूंना दुसरे दोन वधस्तंभ होते. मरणाच्या शिक्षेस पात्र ठरवलेल्या दोन गुन्हेगारांना त्यांवर खिळले गेले होते. विशेष हे की, मरणयातना सोसत असतानादेखील येशू त्यांच्याबरोबर बोलत होता. मुखपृष्ठावरील चित्रातल्या तिन्ही वधस्तंभांच्या भोवती समांतर वर्तुळे दाखवली आहेत, जी ध्वनिलहरी दर्शवतात. ही वर्तुळे, म्हणजे त्या ध्वनिलहरी, एकमेकांत मिसळतात, जे संवादाचे प्रतीक आहे.

तीन वधस्तंभांतला उंच आणि मोठा वधस्तंभ येशूचा आहे. तो हे दर्शवतो की, मानवाला तारण मिळावे म्हणून येशूने वधस्तंभावरचे मरण स्वीकारले असले तरी स्वर्गात त्याला सर्वोच्च स्थान आहे. तो राजांचा राजा आणि प्रभूंचा प्रभू म्हणून पुन्हा येणार आहे.

- रंजन केळकर

# अनुक्रमणिका


१ बालपणीचा संवाद .................................. ८

२ सुरुवातीचे संवाद .................................. ११

३ सैतानाबरोबर वादविवाद ...................... १५

४ हा तर सुतार ना? .................................. १८

५ सनातन जीवन ........................................ २७

६ यहुदी लोकांबरोबर संवाद ....................... ३५

७ प्रथा आणि प्रश्न ........................................ ४१

८ वैयक्तिक संवाद ........................................ ५१

९ शिष्यांबरोबर संवाद ................................ ६०

१० अखेरचे संवाद ........................................ ६६

११ येशूची चौकशी ........................................ ७३

१२ वधस्तंभांवरचा संवाद .............................. ७७

१३ पुनरुत्थानानंतरचे संवाद ......................... ७९

१४ स्वर्गारोहणापूर्वीचे संवाद ......................... ८७

१५ शेवटचा संवाद ........................................ ९०

# १
# बालपणीचा संवाद

**ख्रिसमसचा** सण जगभर उत्साहाने साजरा केला जातो. त्या दिवसाच्या आनंदात ख्रिस्ताचे अनुयायी नसलेले लोकदेखील सहभागी होतात. प्रभू येशूच्या जन्माची कथा आता सर्वांच्या परिचयाची झाली आहे. येशूचा जन्म एक अद्‌भुत आणि सर्व जगासाठी अतिशय महत्वाची घटना होती ह्यात शंका नाही. देवाचा पुत्र मानवी देह धारण करून जगात आला आहे हे देवाच्या दूतांनी स्वतः पृथ्वीवर येऊन लोकांना सांगितले होते.

येशूचे बालपण मात्र नासरेथ नावाच्या एका लहान गावातल्या एका सामान्य घरात गेले. सामान्य आईबाप आपल्या मुलांना जसे वाढवतात तसेच मरिया आणि योसेफ ह्यांनी त्याला लहानाचे मोठे केले असावे असे मानायला काही हरकत नाही. योसेफ एक सुतार होता आणि येशू सुताराचा मुलगा म्हणून ओळखला जाऊ लागला. (मत्तय १३:५४-५८)

पवित्र शास्त्रात येशूच्या बालपणाविषयी एवढेच लिहिले आहे की, “मुलगा वाढला, बलवान झाला, ज्ञानीपणाने भरला, आणि देवाची कृपा त्याच्यावर होती.” (लूक २:४०)

•

वल्हांडण सण हा यहुदी लोकांचा एक महत्वाचा सण असे. मरिया आणि योसेफ दर वर्षी वल्हांडण सण साजरा करायला

नासरेथहून यरुशलेमला जात असत. येशू जेव्हा बारा वर्षांचा झाला तेव्हा त्या सणाच्या परिपाठाप्रमाणे ते त्यालाही आपल्याबरोबर यरुशलेमला घेऊन गेले. पण सण संपल्यानंतर ते जेव्हा आपल्या गावी परत जायला निघाले तेव्हा येशू यरुशलेमलाच मागे राहिला होता हे त्यांना कळले नाही. आधी त्यांना वाटले की, तो वाटसरू मंडळीत असेल. एक दिवस चालल्यानंतरही तो त्यांना भेटला नाही तेव्हा मात्र त्यांना काळजी वाटू लागली आणि ते आपल्या आप्तजनांत आणि ओळखीच्या लोकांत त्याच्याविषयी विचारपूस करू लागले. खूप शोध करूनसुद्धा तो त्यांना सापडला नाही तेव्हा योसेफ आणि मरिया पुन्हा यरुशलेमच्या दिशेने परत फिरले.

तीन दिवसांनंतर तो त्यांना दिसला तो यरुशलेमच्या मंदिरात. गुरुजनांच्या मध्यभागी बसून तो त्यांचे ऐकत होता आणि त्यांना प्रश्न विचारीत होता. जे लोक त्याचे ऐकत होते ते सर्व त्याच्या बुद्धिचातुर्याने थक्क झाले होते.

योसेफ आणि मरिया ह्यांनी जेव्हा हे सगळे पाहिले तेव्हा त्यांनाही फार आश्चर्य वाटले. मरियेने त्याला विचारले, "बाळ, तू आमच्याशी असा का वागलास? बघ, आम्ही किती काळजीत होतो आणि आम्ही तुला कुठंकुठं शोधलं!"

पण येशू आपल्या आईबापांना पाहून एखाद्या हरवलेल्या मुलासारखा त्यांच्याकडे धावून गेला नाही. त्याची प्रतिक्रिया अगदी निराळी होती. त्याने त्यांनाच विचारले, "तुम्ही मला का शोधत होता? मी माझ्या पित्याच्या घरात असलो पाहिजे हे तुम्ही ओळखलं नाही का?"

ह्या लहानशा संवादानंतर पवित्र शास्त्रात असे लिहिले आहे की, येशू त्याच्या आईबापांबरोबर परत गेला आणि नंतर त्यांच्याबरोबर नासरेथला राहिला. आणखी एवढेच लिहिले आहे की, तो त्यांना आज्ञांकित राहिला आणि देवाच्या आणि मनुष्यांच्या कृपेत वाढत गेला. (लूक २:४१-५२) येशू त्याच्या आईबापांना आज्ञांकित राहिला असला तरीपण तो देवाचा पुत्र होता आणि त्याच्या पित्याचे खरे घर कोणते होते ह्याविषयीचे ज्ञान त्याला लहानपणीच मिळाले होते.

•

आपल्यापासून आपली मुले दूर कुठे तरी गेली असली किंवा एखाद्या रात्री त्यांना घरी परत यायला खूप उशीर झाला, तर आपण किती चिंतित होतो ना? मनात नाहीनाही ते विचार येतात. त्यांची आपण सारखी वाट पहात राहतो. दरवाजावर आपण टक लावून असतो. त्याचप्रमाणे आपण जेव्हा आपल्या देवपित्यापासून दूर जातो, रस्ता चुकतो, भटकतो, तेव्हा त्यालाही तसेच वाटत असेल ना? तोही स्वस्थ बसू शकत नाही. मग तो काय करतो? तो त्याच्या पुत्राला आपला शोध घ्यायला पाठवतो. प्रभू येशू स्वतःविषयी म्हणाला होता, "मनुष्याचा पुत्र जे हरवले आहेत त्यांना शोधायला आणि तारायला आला आहे." (लूक १९:१०)

•

# २
# सुरुवातीचे संवाद

**प्रभू** येशूने त्याच्या पृथ्वीवरील सेवाकार्याची सुरुवात केली त्यावेळी तो सुमारे तीस वर्षांचा होता. (लूक ३:२३) पण त्यापूर्वी त्याच्या तरुणपणाचा काळ त्याने कसा घालवला, त्याचे शिक्षण कुठे झाले, त्याची जीवनशैली कशी होती, त्याचे व्यक्तिमत्व कसे होते, ह्याविषयी पवित्र शास्त्रात काहीच लिहिलेले नाही. पण त्याच्या जीवनाचे उद्दिष्ट त्याला स्पष्टपणे माहीत होते आणि ते पूर्ण करण्यासाठी तो तयारी करत असला पाहिजे हे निश्चित. ते आपल्याला कोणी सांगायची गरज नाही.

येशू त्याचे सेवाकार्य लवकरच सुरू करणार आहे ह्याची पूर्वकल्पना लोकांना देण्याचे काम योहान नावाचा दुसरा एक तरुण मनुष्य करू लागला होता. यहुदियाच्या डोंगराळ प्रदेशात राहणारा याजक जखर्या आणि त्याची पत्नी अलिशिबा ह्यांचा तो मुलगा होता. अलिशिबा ही मरियेच्या नातलगांपैकी होती. येशू आणि योहान ह्या दोघांचाही जन्म एकाच सुमारास झाला होता. योहान यहुदियाच्या रानात फिरू लागला आणि घोषणा करू लागला, "पश्चात्ताप करा, कारण स्वर्गाचं राज्य जवळ आलं आहे."

यरुशलेम, सर्व यहुदिया आणि यार्देनेच्या आसपासच्या प्रांतातील लोक योहानाकडे येत होते आणि आपली पापे कबूल करून

त्याच्याकडून यार्देन नदीत बाप्तिस्मा घेत होते. त्यामुळे लोक त्याला बाप्तिस्मा करणारा योहान असे म्हणू लागले.

पुष्कळ जण योहानाचे शिष्य बनले पण तो त्यांना येशूची वाट पहायला सांगत असे, "मी तर, पश्चात्तापासाठी, तुमचा बाप्तिस्मा पाण्यानं करतो, पण माझ्या मागून जो येणार आहे तो माझ्यापेक्षा समर्थ आहे. मी त्याच्या वहाणा उचलायला लायक नाही. तो तुमचा बाप्तिस्मा पवित्र आत्म्यानं आणि अग्नीनं करील."

त्यानंतर असे झाले की, येशू स्वतः योहानाकडून बाप्तिस्मा घ्यायला गालिलातील नासरेथहून यार्देनेकडे गेला. पण योहानाला ते मुळीच आवडले नाही आणि त्याने येशूला म्हटले, "मलाच तुझ्याकडून बाप्तिस्मा घ्यायची गरज आहे. आणि तू माझ्याकडे का येतोस?"

तेव्हा येशूने योहानाला विनंती केली, "आता मला येऊ दे, कारण आपण असं सर्व न्यायीपण पूर्ण करावं हे उचित आहे."

शेवटी योहानाला त्याचे म्हणणे मान्य करावे लागले आणि येशूने योहानाकडून बाप्तिस्मा घेतला. पवित्र शास्त्रात लिहिले आहे की, त्या वेळी आकाश उघडले, देवाचा आत्मा कबुतरासारखा येशूवर उतरताना दिसला. आणि आकाशातून एक वाणी ऐकू आली, "हा माझा प्रिय पुत्र आहे, ह्याच्याविषयी मी संतुष्ट आहे." (मत्तय ३:१-१७, मार्क १:१-११, लूक ३:२१-२२)

•

बाप्तिस्मा करणारा योहान एकदा त्याच्या दोन शिष्यांबरोबर उभा होता आणि येशू समोरून जात असल्याचे त्याने पाहिले.

येशूकडे पाहून योहान म्हणाला, “बघा, देवाचा कोकरा!” योहानाच्या शिष्यांनी ते ऐकले आणि ते येशूच्या मागोमाग गेले. तेव्हा येशू वळला आणि त्याने त्यांना विचारले, “तुम्ही काय शोधता?”

त्या शिष्यांनी त्याला विचारले, “गुरू, आपण कुठं राहता?”

येशू एवढेच म्हणाला, “या आणि पहा.”

तेव्हा ते दोघे जण त्याच्याबरोबर गेले, तो कोठे राहतो ते त्यांनी स्वतः बघितले आणि ते त्या दिवशी त्याच्या घरी राहिले. त्या दोघांपैकी एकाचे नाव अंद्रिया होते. अंद्रिया त्याचा भाऊ शिमोन पेत्र ह्याला भेटला आणि त्याला म्हणाला, “आम्हाला मशिहा, म्हणजे ख्रिस्त, सापडला आहे.” (योहान १:३५-४१)

•

आजच्या सामाजिक प्रथेप्रमाणे जेव्हा अनोळखी लोक प्रथमच औपचारिकपणे भेटतात तेव्हा ते एकमेकांना आपआपले बिझनेस कार्ड सादर करतात. बिझनेस कार्डवर त्यांचे नाव, काम, पत्ता, फोन नंबर, वगैरे माहिती छापलेली असते. मग नंतर त्यानुसार त्यांच्याशी संपर्क साधता येतो. आज जर आपल्याला येशू प्रथमच भेटला आणि आपण त्याला विचारले, “आपण कुठं राहता?” तर तो काय म्हणेल? तो “या आणि पहा,” असे म्हणेल का? किंवा तो आपल्याला त्याचे बिझनेस कार्ड देईल का? अर्थातच नाही.

येशूने आपल्याला सांगितले आहे की, त्याच्या पित्याचे आलिशान बंगले आहेत, ज्यात आपल्यासाठी जागा तयार करायला तो आपल्या पुढे गेला आहे. (योहान १४:२)

पण येशूची राहायची आवडती जागा आपल्या अंतःकरणात आहे. तो आपल्या अंतःकरणाच्या बाहेर उभा राहून दार ठोठावीत आहे. (प्रकटी. ३:२०) त्याला आपण आत घेतले तर आपण लोकांना म्हणू शकू, “या आणि पहा, येशू माझ्या घरी राहतो!”

•

# ३

# सैतानाबरोबर वादविवाद

**पवित्र** शास्त्रात नमूद केलेला येशूचा पहिला वादविवाद लोकांबरोबर किंवा त्याच्या शिष्यांबरोबर नसून सैतानाबरोबरचा आहे. येशूची सैतानाकडून परीक्षा व्हावी हे जणू पूर्वनियोजित होते. पवित्र आत्मा येशूला रानातल्या एका निर्जन स्थळी घेऊन गेला होता. त्याच्या सभोवती फक्त वन्य पशू फिरत होते. येशूने तेथे चाळीस दिवस आणि चाळीस रात्री उपास केला होता. शेवटी तर तो भुकेने व्याकूळ झाला असावा. अशा परिस्थितीत येशूच्या समोर अचानक सैतान उभा राहिला.

रानातली ती जागा कदाचित खडकाळ असावी आणि तेथे दगडधोंडे पडलेले असावेत. ते पाहून सैतानाने येशूला केलेले पहिले आव्हान होते, “तू जर देवाचा पुत्र आहेस तर ह्या दगडाच्या भाकरी व्हाव्यात म्हणून आज्ञा कर.” पण येशूने सैतानाचे आव्हान स्वीकारले नाही. त्याने त्याला त्या दगडांच्या भाकरी करून दाखवल्या नाहीत. येशूने सैतानापुढे एक शास्त्रवचन सादर केले. येशू म्हणाला, “ ‘मनुष्य केवळ भाकरीने नाही, पण देवाच्या मुखातून निघणाऱ्या प्रत्येक शब्दाने वाचेल ’, असं लिहिलं आहे.”

त्या खडकाळ जागी येशूने त्याला निरुत्तर केल्यामुळे सैतानाने आपली रणनीती बदलली. सैतान त्याला यरुशलेमला घेऊन गेला आणि तेथील मंदिराच्या एका उंच मनोऱ्यावर त्याने

त्याला उभे केले. आणि मग आश्चर्य हे की, सैतानाच्या मुखातून देवाचे वचन निघाले! त्याचे दुसरे आव्हान होते, "तू जर देवाचा पुत्र आहेस तर खाली उडी टाक. कारण असं लिहिलं आहे की, 'मी तुझ्याविषयी आपल्या दिव्य दूतांना आज्ञा देईन आणि तू आपला पाय दगडावर आदळू नयेस म्हणून ते तुला आपल्या हातांवर घेतील'."

सैतानाचे हेही आव्हान येशूने स्वीकारले नाही. त्याला उत्तर म्हणून येशूने त्याला देवाच्या एका आज्ञेची आठवण करून दिली, तो त्याला म्हणाला, "असं लिहिलं आहे की, 'तू आपला देव परमेश्वर ह्याची परीक्षा करू नकोस'."

पण सैतान अजून हार मानायला तयार नव्हता. एक अखेरचा प्रयत्न म्हणून तो येशूला एका अतिशय उंच शिखरावर घेऊन गेला आणि तेथून त्याने जगातली सर्व राज्ये आणि त्यांचे वैभव त्याला दाखवले. आणि मग सैतान येशूकडे बघून त्याला म्हणाला, "तू जर पालथा पडून मला नमन करशील तर मी हे सर्व तुला देईन."

ह्या वेळीही येशूने सैतानाला देवाच्या दुसऱ्या एका आज्ञेची आठवण करून दिली, आणि तो म्हणाला, "अरे सैताना, इथून नीघ, कारण असं लिहिलं आहे की, 'तू आपला देव परमेश्वर ह्याला नमन कर आणि केवळ त्याचीच उपासना कर'."

शेवटी सैतान येशूला सोडून गेला आणि देवदूत येऊन येशूची सेवा करू लागले. (मत्तय ४:१-११, मार्क १:१२-१३, लूक ४:१-१३, अनुवाद ६:१३, ६:१६, ८:३, स्तोत्र ९१:११-१२)

•

सैतानाने येशूबरोबर वैयक्तिक पातळीवर द्वंद्व केले. पण प्रत्येक वेळी देवाचे वचन त्याच्यापुढे ठेवून येशूने त्यांच्यातील वादविवादाची पातळी फार उंचावली. आणि शेवटी विजय देवाच्या वचनाचा झाला.

असे लिहिले आहे की, देवाचे वचन जिवंत व परिणामकारक आहे. कोणत्याही दुधारी तरवारीहून ते धारदार असून जीव व आत्मा, संधी व मज्जा हे अलग करून ते पार जाते, आणि मनातील विचार व हेतू ते पारखते. (इब्री. ४:१२) देवाच्या मुखातून निघालेले वचन कधीही विफल होऊन परत जात नाही. (यशया ५५:११)

आज जेव्हा सैतान आपल्यासमोर उभा राहतो तेव्हा आपणसुद्धा त्याचा व्यक्तिगत स्तरावर सामना का करावा? येशू आपल्यासाठी एक मोठे उदाहरण आहे. जेव्हा सैतान आपल्या दुर्बलतेचा फायदा घेतो, आपल्याला आमिषे दाखवतो, मोहात पाडतो, आपल्याशी युक्तिवाद लढवतो, तेव्हा येशूप्रमाणे आपणही पवित्र शास्त्रातील वचने आपली शस्त्रे म्हणून सैतानाविरुद्ध वापरली पाहिजेत.

•

# ४

# हा तर सुतार ना?

**येशूने** त्याच्या सेवाकार्याचा आरंभ करण्यापूर्वी तो कोणी नावाजलेला वक्ता किंवा सुप्रसिद्ध शिक्षक नव्हता. लोक त्याला ओळखत होते ते योसेफ आणि मरिया ह्यांचा मुलगा म्हणून. हे शक्य आहे की, तो योसेफाला सुतारकामात मदत करीत असावा किंवा तो स्वतःच एक निष्णात सुतार असावा. म्हणून येशू जेव्हा स्वतःच्याच गावी म्हणजे नासरेथच्या सभास्थानात लोकांपुढे भाषण करायला उभा राहिला तेव्हा त्याची ती एक नवीन ओळख होती.

येशूला त्याच्या नव्या रूपात पाहून आणि त्याचे बोलणे ऐकून लोक आश्चर्यचकित झाले आणि म्हणू लागले, "हा तर सुतार ना? योसेफाचा आणि मरियेचा मुलगा? याकोब, योसे, यहुदा आणि शिमोन ह्यांचा भाऊ? आणि ह्याच्या बहिणी इथं आपल्यात आहेत ना? मग ह्याच्यात हे ज्ञानीपण कुठून आलं? ह्याच्या हातून असे चमत्कार कसे होतात?"

सभास्थानातील लोकांची प्रतिक्रिया बघून येशूला म्हणावे लागले की, "कोणीही संदेष्टा आपल्या स्वतःच्या देशात, स्वतःच्या नातलगात आणि आपल्या घरी असल्याशिवाय त्याचा अवमान होत नाही." (मत्तय १३:५४-५८, मार्क ६:१-६)

•

येशू यरुशलेमच्या मंदिरात शिकवत असतानासुद्धा त्याचे बोलणे ऐकून यहुदी लोकांना असेच आश्चर्य वाटले होते. त्यांनी विचारले, "हा मनुष्य शिकलेला नसताना शास्त्रलेख कसे जाणतो?"

पण येशूने त्यांना उत्तर दिले, "माझं शिक्षण माझं नाही, पण ज्यानं मला धाडलं त्याचं आहे. कोणी त्याच्या इच्छेप्रमाणं करू इच्छील तर त्याला कळेल की, हे शिक्षण त्याचं आहे किंवा मी स्वतःचं सांगतो. जो स्वतःचं सांगतो तो आपलं स्वतःचं गौरव पाहतो. पण जो आपल्याला ज्यानं धाडलं त्याचं गौरव पाहतो तो मनुष्य खरा आहे आणि त्याच्यात काही अनीती नाही." (योहान ७:१४-१८)

•

बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाला येशूविषयी पूर्ण माहिती होती. त्याने येशूचा बाप्तिस्मा केला होता. तो लोकांना सांगत असे की, त्यांनी येशूकडून बाप्तिस्मा घ्यावा. पण नवल हे की, येशू खरोखर मशीहा म्हणजे ख्रिस्त आहे ह्याची पूर्ण खातरी योहानाला स्वतःलाच नव्हती! योहान तुरुंगवासात असताना त्याने त्याच्या दोन शिष्यांना येशूकडे पाठवले. योहानाच्या सांगण्यावरून त्या शिष्यांनी येशूला विचारले, "आपण जो येणार आहे तो आहात की, आम्ही दुसऱ्याची वाट पहावी?"

त्याच वेळी येशूने पुष्कळ जणांना आजारांपासून, व्याधींपासून आणि दुष्ट आत्म्यांच्या बाधांपासून बरे केले होते आणि अनेक अंधळ्यांना दृष्टी दिली होती. म्हणून येशूने योहानाच्या शिष्यांना उत्तर दिले, "जा, आणि तुम्ही ज्या गोष्टी बघितल्यात आणि ऐकल्यात त्या योहानाला सांगा. त्या ह्या की, अंधळे पाहतात,

पांगळे चालतात, कुष्ठरोगी शुद्ध होतात आणि बहिरे ऐकतात, मेलेले उठवले जातात, दीनांना सुवार्ता सांगण्यात येते. आणि ज्या कोणाला माझ्यात अडथळा होणार नाही तो धन्य." (मत्तय ११:२-६, लूक ७:१८-२३)

•

येशू खरोखर कोण आहे हे जाणून घ्यायला यहुदी लोक उतावळे झाले होते आणि ते त्यांनी त्याच्याच तोंडून ऐकायचा प्रयत्न केला. त्यांनी येशूला विचारले, "आपण कुठवर आमचं मन चळवणार? आपण जर ख्रिस्त असाल तर आम्हाला उघडपणे सांगा."

येशूने उत्तर दिले, "मी तुम्हाला सांगितलं पण तुम्ही विश्वास ठेवीत नाही. मी माझ्या पित्याच्या नावानं जी कामं करतो ती माझ्याविषयी साक्ष देतात. पण तुम्ही विश्वास ठेवीत नाही, कारण मी तुम्हाला म्हटल्याप्रमाण तुम्ही माझ्या मेंढरांतले नाही. माझी मेंढरं माझी हाक ऐकतात, मी त्यांना ओळखतो, आणि ती माझ्यामागं येतात. आणि मी त्यांना सनातन जीवन देतो. त्यांचा कधीही नाश होणार नाही, आणि कोणी त्यांना माझ्या हातातून हिसकून घेणार नाही. मला देणारा माझा पिता सर्वांपेक्षा मोठा आहे, आणि माझ्या पित्याच्या हातातून कोणी हिसकून घेऊ शकत नाही. मी आणि पिता एक आहोत." (योहान १०:२४-३०)

दुसऱ्या एका प्रसंगी येशू म्हणाला होता, "ज्यानं मला पाहिलं आहे त्यानं पित्याला पाहिलं आहे." (योहान १४:९)

•

पुन्हा एकदा लोकांनी येशूला विचारले, “ख्रिस्त सर्वकाळ राहील असं आम्ही नियमशास्त्रातून ऐकलं आहे. आपण कसं म्हणता की, मनुष्याचा पुत्र वर चढवला गेला पाहिजे? हा मनुष्याचा पुत्र कोण आहे?”

येशूने त्यांना उत्तर दिले, “आणखी अल्पकाळ तुमच्याबरोबर प्रकाश आहे. तुम्हाला प्रकाश आहे तोवर चाला. नाहीतर अंधार तुम्हाला गाठील. जो अंधारात चालतो त्याला आपण कुठं जातो हे कळत नाही. तुम्हाला प्रकाश आहे तोवर प्रकाशावर विश्वास ठेवा, म्हणजे तुम्ही प्रकाशाचे पुत्र व्हाल.” (योहान १२:३४-३६)

•

“तू कोण आहेस?” असे येशूला स्वतः विचारूनसुद्धा यहुदी लोकांचे समाधान होत नव्हते. त्याने दिलेले स्पष्टीकरण ते मानायला तयार नव्हते. त्याच्यावर विश्वास ठेवण्यापूर्वी त्यांना चिन्ह हवे होते, एखादा चमत्कार हवा होता, काही पुरावा पाहिजे होता.

यहुदी लोकांच्या वल्हांडण सणाच्या वेळी येशू यरुशलेमाच्या मंदिरात गेला होता. तेथे गुरे, मेंढरे आणि कबुतरे विकणारे, तसेच पैशांचा व्यवहार करणारे सराफ बसलेले पाहून त्याला संताप आला. त्याने म्हटले, “तुम्ही माझ्या बापाचं घर हे व्यापाराचं घर करू नका.” आणि त्याने त्या सगळ्यांना त्यांच्या मेंढरांगुरांसकट मंदिरामधून बाहेर घालवले. तेव्हा यहुद्यांनी त्याला विचारले, “तू हे करतोस तर आम्हाला चिन्ह काय दाखवतोस?”

येशूने त्यांना उत्तर दिले, “तुम्ही हे मंदिर मोडा, आणि मी ते तीन दिवसांत उभं करीन.”

तेव्हा यहुदी म्हणाले, "शेहेचाळीस वर्षं हे मंदिर बांधलं जात होतं आणि तू ते तीन दिवसांत उभं करशील काय?" पण तो तर आपल्या शरीररूपी मंदिराविषयी बोलला होता. म्हणून तो मेलेल्यांतून पुन्हा उठल्यावर त्याच्या शिष्यांना त्याचे हे शब्द आठवले. (योहान २:१३-२१)

•

दुसऱ्या एका प्रसंगी लोकांनी येशूला प्रश्न विचारला, "आपण कोणतं चिन्ह दाखवता की, ते बघून आम्ही आपल्यावर विश्वास ठेवावा? आमच्या पूर्वजांनी अरण्यात मान्ना खाल्ला कारण 'त्याने त्यांना स्वर्गातील भाकर खायला दिली', असं लिहिलेलं आहे."

येशूने उत्तर दिले, "मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो, मोशेनं तुम्हाला स्वर्गातील भाकर दिली नाही. पण माझा पिता तुम्हाला स्वर्गातील खरी भाकर देतो. कारण देवाची भाकर स्वर्गातून उतरून जगाला जीवन देत आहे."

हे ऐकून लोक त्याला म्हणाले, "महाराज, ह्यापुढं ही भाकर आम्हाला द्या." तेव्हा येशू त्यांना म्हणाला, "मी जीवनाची भाकर आहे. माझ्याकडे जो येतो त्याला कधीही भूक लागणार नाही, आणि माझ्यावर विश्वास ठेवतो त्याला कधीही तहान लागणार नाही."

यहुद्यांनी विचारले, "हा येशू योसेफाचा मुलगा नाही काय? ह्याच्या बापाला आणि आईला आम्ही ओळखतो. आता हा कसं म्हणतो, 'मी स्वर्गातून उतरलो आहे'?"

येशूने उत्तर दिले, "तुम्ही आपआपल्यात कुरकुर करू नका. ज्या पित्यानं मला धाडलं त्यानं कोणाला ओढल्याशिवाय तो

माझ्याकडे येऊ शकत नाही. आणि, मी त्याला शेवटच्या दिवशी पुन्हा उठवीन. आणि 'ते सगळे देवाने शिकवलेले होतील', असं संदेष्ट्यांत लिहिलं आहे, म्हणून जो पित्याकडून ऐकून शिकला आहे असा प्रत्येक मनुष्य माझ्याकडे येतो. जो देवापासून आहे त्यानं पित्याला पाहिलं आहे. त्याच्याशिवाय कोणी पित्याला पाहिलं आहे असं नाही. मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो, जो माझ्यावर विश्वास ठेवतो त्याला सनातन जीवन आहे. मीच जीवनाची भाकर आहे. तुमच्या पूर्वजांनी रानात मान्ना खाल्ला आणि ते मेले. पण स्वर्गातून उतरलेली भाकर अशी आहे की, कोणीही ती खावी आणि मरू नये. मी स्वर्गातून उतरलेली जिवंत भाकर आहे. ह्या भाकरीतून कोणी खाईल तर तो सर्वकाळ जिवंत राहील. आणि, जगाच्या जीवनासाठी मी जी भाकर देईन ती माझा देह आहे."

पण यहुद्यांनी आणखी विचारले, "हा आम्हाला आपला देह कसा खायला देऊ शकेल?"

येशू पुन्हा म्हणाला, "मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो, तुम्ही जोवर मनुष्याच्या पुत्राचा देह खात नाही, आणि त्याचं रक्त पीत नाही तोवर तुम्हाला तुमच्यात जीवन नाही. जो माझा देह खातो आणि माझं रक्त पितो त्याला सनातन जीवन आहे. आणि मी त्याला शेवटच्या दिवशी पुन्हा उठवीन. कारण, खरोखर, माझा देह अन्न आहे, आणि, खरोखर, माझं रक्त पेय आहे. जो माझा देह खातो आणि माझं रक्त पितो तो माझ्यात राहतो आणि मी त्याच्यात राहतो. जिवंत पित्यानं जसं मला पाठवलं, आणि मी जसा पित्यामुळं जगतो तसा जो मला खातो तोही माझ्यामुळं जगेल. हीच स्वर्गातून उतरलेली भाकर आहे. जी पूर्वजांनी खाल्ली आणि ते मेले तशी ही

नाही. जो कोणी ह्या भाकरीतून खातो तो सर्वकाळ जगेल." (योहान ६:३०-५९)

•

पुन्हा एकदा काही शास्त्री आणि परोशी येशूला म्हणाले, "गुरू, आपल्याकडून काही चिन्ह बघावं अशी आमची इच्छा आहे."

पण ह्यावेळी मात्र येशू त्यांना म्हणाला, "ही दुष्ट आणि व्यभिचारी पिढी चिन्ह मागते, पण योना संदेष्ट्याच्या चिन्हाशिवाय तिला कोणतंच चिन्ह दिलं जाणार नाही. कारण जसा योना तीन दिवस आणि तीन रात्री मोठ्या माशाच्या पोटात होता तसा मनुष्याचा पुत्र तीन दिवस आणि तीन रात्री पृथ्वीच्या पोटात असेल. निनवेचे लोक न्यायाच्या वेळी, ह्या पिढीबरोबर उठतील आणि हिला दोषी ठरवतील. कारण त्यांनी योनाच्या उपदेशावरून पश्चात्ताप केला; आणि बघा, योनापेक्षा इथं काही अधिक आहे. दक्षिणेची राणी न्यायाच्या वेळी, ह्या पिढीबरोबर उठेल आणि हिला दोषी ठरवील. कारण ती पृथ्वीच्या सीमेपासून शलमोनाचं ज्ञानीपण ऐकायला आली. आणि बघा, शलमोनापेक्षा इथं काही अधिक आहे." (मत्तय १२:३८-४२)

•

एकदा येशूने आपल्या शिष्यांना विचारले, "मनुष्याचा पुत्र कोण आहे म्हणून लोक म्हणतात?"

आणि ते म्हणाले, "कित्येक म्हणतात, बाप्तिस्मा करणारा योहान, कित्येक एलिया, आणि कित्येक यिर्मया किंवा संदेष्ट्यांतला कोणी आहे, असं म्हणतात."

पण येशूला आपल्या शिष्यांचे मन जाणून घ्यायची इच्छा होते. म्हणून पुन्हा त्याने प्रश्न विचारला, "पण मी कोण आहे असं तुम्हाला वाटतं?"

तेव्हा येशूचा शिष्य शिमोन पेत्र ह्याने उत्तर दिले, "तू ख्रिस्त, जिवंत देवाचा पुत्र आहेस."

त्यावर येशूने म्हटले, "शिमोना, बर्योना, तू धन्य आहेस. कारण देहानं आणि रक्तानं तुला हे प्रकट केलं नाही पण माझ्या स्वर्गातील पित्यानं केलं आहे. आणि मी तुला आणखी सांगतो, तू पेत्र आहेस. मी ह्या खडकावर माझी मंडळी उभारीन, आणि अधोलोकाच्या वेशी तिच्यावर जय मिळवणार नाहीत. मी तुला स्वर्गाच्या राज्याच्या किल्ल्या देईन. तू जे पृथ्वीवर बंधनात बांधशील ते स्वर्गात बांधलं जाईल आणि तू जे पृथ्वीवर सोडशील ते स्वर्गात सोडलं जाईल." (मत्तय १६:१३-२०)

•

हल्ली आपण कोणत्याही महत्वाच्या ठिकाणी गेलो तर "तुमची आय डी दाखवा " अशी आपल्याला विनंती करण्यात येते. बँकेत, विमानतळावर, सरकारी कार्यालयात, काही शॉपिंग मॉलमध्ये, आपल्याला पॅन कार्ड, पासपोर्ट किंवा आधार कार्ड असे काही ओळखपत्र दाखवावे लागते. पण दोन हजार वर्षांपूर्वीसुद्धा येशूकडून लोक पुरावा मागायचे की, तो खरोखरच देवाचा पुत्र आहे. तो स्वतःविषयी जे सांगत असे ते त्यांना पटत नसे. "तू कोण आहेस?" हा प्रश्न येशूला मरणाची शिक्षा द्यायच्या वेळीसुद्धा त्याला पुन्हा पुन्हा विचारला गेला होता. तो ख्रिस्त आहे किंवा यहुद्यांचा

राजा आहे किंवा देवाचा पुत्र आहे, हे तेव्हादेखील लोकांना समजले नव्हते.

आजची परिस्थितीसुद्धा फारशी निराळी नाही. येशू कोण होता हे जगातील असंख्य लोकांना माहीत नाही किंवा तो केवळ एक सामान्य माणूस असावा असे त्यांना वाटते. काहींना त्याचे तत्वज्ञान आवडते. कोणी त्याला महान शिक्षकाचा दर्जा देतात. पण असे थोडकेच आहेत जे त्याला देवाचा पुत्र मानायला तयार आहेत.

"तू कोण आहेस?" हा प्रश्न आपण स्वतः येशूला विचारावा आणि त्याचे उत्तर ऐकावे!

•

# ५
# सनातन जीवन

**योहान ३:१६** हे पवित्र शास्त्रातील सर्वात लोकप्रिय आणि सुप्रसिद्ध वचन आहे आणि ते असे आहेः "कारण देवाने जगावर एवढी प्रीती केली की, त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला ह्यासाठी की, जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सनातन जीवन मिळावे."

पण ह्या जगात जन्माला आलेल्या प्रत्येक माणसाचा मृत्यू तर होतोच. मग कोणी सर्वकाळ कसा जगू शकेल? सनातन जीवन म्हणजे काय? ते मिळवण्याची प्रक्रिया काय आहे? तारण म्हणजे काय? ते कसे होते? योहान ३:१६ हे वचन वाचल्यावर किंवा ऐकल्यावर असे अनेक प्रश्न आपल्या मनात आल्याशिवाय राहात नाहीत.

प्रभू येशूलासुद्धा किती तरी लोकांनी ह्या प्रकारचे प्रश्न विचारले होते. त्याने त्या वेळी जी उत्तरे दिली ती आजसुद्धा आपल्या उपयोगी पडतील अशी आहेत.

•

यरुशलेम नगरात निकदेम नावाचा एक परोशी होता. तो यहुदी लोकांचा एक अधिकारी होता आणि समाजात त्याला मोठे स्थान होते. दिवसा त्याला वेळ मिळत नसावा किंवा लोकांनी त्याला पाहू नये म्हणून, निकदेम एका रात्री येशूला भेटायला गेला. यहुदी

लोक त्यांच्या गुरूंना आणि शिक्षकांना आदराने रब्बी म्हणायचे. तोच सन्मान त्याने येशूला दिला आणि म्हटले, "रब्बी, आपण देवाकडून आलेले शिक्षक आहा हे आम्ही जाणतो, कारण आपण जी चिन्हं करीत आहा ती कोणीही मनुष्य, त्याच्याबरोबर देव असल्याशिवाय करू शकणार नाही."

येशूने त्याला म्हटले, "मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो, कोणीही मनुष्य पुन्हा जन्मल्याशिवाय देवाचं राज्य बघू शकणार नाही."

ह्यावर निकदेमाने येशूला विचारले, "पण मनुष्य मोठा झाल्यानंतर जन्म कसा घेऊ शकेल? त्यासाठी त्याला आपल्या आईच्या उदरात पुन्हा कसे जाता येईल?"

येशूने उत्तर दिले, "मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो, कोणीही मनुष्य पाण्यापासून आणि आत्म्यापासून जन्मल्याशिवाय तो देवाच्या राज्यात येऊ शकत नाही. देहापासून जन्मलेला देह आहे, आणि आत्म्यापासून जन्मलेला आत्मा आहे. तुम्हाला पुन्हा जन्मलं पाहिजे, असं मी तुम्हाला म्हटलं ह्याचं आश्चर्य करू नका." येशूने वाऱ्याचे उदाहरण दिले. "वारा पाहिजे तिकडे वाहतो आणि तुम्ही त्याचा आवाज ऐकता, पण तो कोठून येतो आणि कुठं जातो हे तुम्हाला कळत नाही. आत्म्यापासून जन्मलेल्या प्रत्येक मनुष्याचं असंच आहे."

कदाचित निकदेमाचे समाधान झाले नसावे, किंवा त्याला जे समजले ते तो मानायला तयार नसावा. त्याने विचारले, "ह्या गोष्टी कशा होऊ शकतील?"

पण येशूने त्यालाच परत प्रश्न केला, “तुम्ही इस्त्राएलाचे गुरू आहा, आणि ह्या गोष्टी जाणत नाही?”

मग येशू म्हणाला, “मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो, आम्ही जे जाणतो ते आम्ही बोलतो, आणि आम्ही जे पाहिलं आहे त्याची साक्ष देतो, पण तुम्ही आमची साक्ष स्वीकारीत नाही. मी पृथ्वीवरच्या गोष्टी जर तुम्हाला सांगितल्या तर तुम्ही विश्वास ठेवीत नाही. मग, मी स्वर्गातल्या गोष्टी जर तुम्हाला सांगितल्या तर तुम्ही विश्वास कसा ठेवाल? जो मनुष्याचा पुत्र स्वर्गातून आला त्याच्याशिवाय कोणीही मनुष्य स्वर्गात चढलेला नाही. आणि मोशेनं रानात जसा साप वर चढवला तसाच मनुष्याचा पुत्र वर चढवला गेला पाहिजे, ह्यासाठी की, जो कोणी विश्वास ठेवतो त्याला त्याच्या ठायी सनातन जीवन मिळावं.” (योहान ३:१-१५)

योहान ३:१६ ह्या वचनाची ही पूर्वपीठिका आहे. येशूचे स्पष्टीकरण हे आहे की, सनातन जीवनाचे तत्वज्ञान किंवा तारणाची प्रक्रिया कोणाला पूर्णपणे समजत नसेल तरी काही हरकत नाही. देवाची प्रीती समजून घेणे आणि त्याच्यावर विश्वास ठेवणे ह्याची फक्त गरज आहे. कारण जगातील सर्व लोकांचे तारण व्हावे अशी देवाची स्वतःची इच्छा आहे आणि त्यासाठी त्याने स्वतःच्या पुत्राला जगात पाठवले. (योहान ३:१७)

•

एकदा एक शास्त्री येशूसमोर उभा राहिला आणि त्याची परीक्षा करावी ह्या हेतूने त्याने त्याला प्रश्न विचारला, “गुरू, सार्वकालिक जीवन हे वतन मिळवायला मी काय करू?”

येशूला प्रश्न विचारणारा हा मनुष्य अर्थातच यहुदी धर्मशास्त्रात पारंगत असला पाहिजे. त्याच्या प्रश्नाचे उत्तर तो कदाचित जाणून होता. आणि म्हणून येशूने त्याच्यापुढे काही नवीन विकल्प ठेवले नाहीत, त्याला नवे मार्ग दाखवले नाहीत. त्याने एवढेच विचारले, “नियमशास्त्रात काय लिहिलं आहे? तू काय वाचलं आहेस?”

शास्त्र्याने लगेच नियमशास्त्रातील संबंधित उतारे येशूपुढे मांडले, “ ‘तुझा देव परमेश्वर ह्याच्यावर तू आपल्या पूर्ण मनाने, पूर्ण जिवाने, पूर्ण शक्तीने आणि पूर्ण बुद्धीने प्रीती कर ’ आणि ‘तू जशी आपल्यावर तशीच आपल्या शेजाऱ्यावर प्रीती कर. ’ ”

येशू त्याला थोडक्यात म्हणाला, “तू बरोबर उत्तर दिलंस. हे कर, आणि तू जगशील.”

पण तो शास्त्री इतक्या लवकर आपला संवाद संपवायला तयार नव्हता. त्याने तो पुढे सुरू ठेवला कारण त्याला स्वतःला नीतिमान ठरवायचे होते. म्हणून त्याने येशूला आणखी एक प्रश्न विचारला, “आणि माझा शेजारी कोण?”

येशूला त्याचा हेतू कळला होता. त्याने शेजारधर्मावर व्याख्यान दिले नाही, पण त्याला एक दाखला सांगितला, “एक मनुष्य यरुशलेमहून खाली यरिहोकडे निघाला, आणि चोरांच्या गराड्यात पडला. त्यांनी त्याचे कपडे काढले, त्याला फटके लगावले, त्याला अर्धमेला करून सोडलं, आणि ते निघून गेले. एक याजक त्या वाटेनं खाली चालला होता, पण त्यानं त्याला बघितलं तेव्हा तो दुसऱ्या बाजूकडून निघून गेला. तसाच एक लेवी त्या ठिकाणी आला, पण तोसुद्धा दुसऱ्या बाजूने गेला. नंतर एक शोमरोनी तेथून

प्रवास करीत असताना त्याला तो जखमी माणूस दिसला. त्याला त्याचा कळवळा आला आणि तो त्याच्या जवळ गेला. त्यानं त्याच्या जखमांवर तेल आणि द्राक्षारस ओतून त्या बांधल्या. त्याला आपल्या जनावरावर बसवून एका उतारशाळेत नेलं. त्यानं दोन दिनार काढून ते उतारशाळेच्या मालकाला दिले, आणि त्याला सांगितले, 'ह्याची चांगली काळजी घ्या, आणि तुम्ही जे काही अधिक खर्चाल ते मी पुन्हा परत येईन तेव्हा तुम्हाला देईन.' "

हा दाखला सांगून झाल्यावर येशूने शास्त्र्याला प्रश्न विचारला, "तर जो चोरांच्या गराड्यात पडला त्याचा शेजारी ह्या तिघांतून कोण झाला असं तू समजतोस?"

शास्त्री म्हणाला, "ज्यानं त्याच्यावर दया केली तो."

तेव्हा येशू त्याला म्हणाला, "जा, आणि तू तसंच कर." (लूक १०:२५-३७)

•

येशू देवाच्या राज्याची सुवार्ता गाजवीत गावोगावी, खेड्यापाड्यातून इतका प्रवास करत असे की, त्याला स्वतःचे असे घर राहिलेच नव्हते. तो म्हणत असे की, "खोकडांना बिळं आणि आकाशातल्या पक्ष्यांना घरटी आहेत, पण मनुष्याच्या पुत्राला डोकं टेकायला कुठंच काही नाही." (मत्तय ८:२०, लूक ९:५८)

येशू एकदा गालिलातून निघाला आणि यार्देनेच्या दुसऱ्या बाजूला यहुदियाच्या प्रांतात आला. तेव्हा लोकांचे मोठाले घोळके त्याच्या मागोमाग गेले. पण एक जण फार घाईत असल्यासारखा येशूकडे धावत आला. तो एक अधिकारी होता, पण त्याने येशूपुढे

गुडघे टेकले आणि विचारले, “उत्तम गुरू, सनातन जीवन हे वतन मिळावं म्हणून मी काय करू?”

येशूने आधी त्याला विचारले, “मला उत्तम का म्हणतोस? एका देवाशिवाय कोणी उत्तम नाही.” आणि मग म्हटले, “तू आज्ञा जाणतोस, ‘खून करू नको, व्यभिचार करू नको, चोरी करू नको, खोटी साक्ष देऊ नको, फसवू नको आणि तू आपल्या बापाला आणि आईला मान दे.’ ”

तेव्हा तो येशूला म्हणाला, “गुरू, मी ह्या सगळ्या लहानपणापासून पाळल्या आहेत.”

पण येशूने त्याच्याकडे न्याहाळून पाहिले आणि त्याला म्हटले, “तुझ्यात एक गोष्ट कमी आहे. जा, तुझ्याजवळ जे आहे ते वीक आणि गरिबांना दे. आणि स्वर्गात तुला धन मिळेल. मग चल, माझ्यामागं ये.”

त्या माणसाने हे ऐकले तेव्हा तो फार दुःखी झाला, कारण तो फार धनवान होता. येशूने त्याच्याकडे बघून म्हटले, “ज्यांच्याजवळ संपत्ती आहे त्यांना देवाच्या राज्यात प्रवेश करणं किती कठिण आहे? कारण धनवान मनुष्याला देवाच्या राज्यात प्रवेश करण्यापेक्षा उंटाला सुईच्या नाकातून जाणं सोपं आहे.”

येशूचे हे उद्गार ऐकून लोकांनी विचारले, “मग कोण तारला जाईल?”

तो त्यांना म्हणाला, “मनुष्यांना हे अशक्य आहे, पण देवाला नाही, कारण देवाला सर्व गोष्टी शक्य आहेत.” (मत्तय १९:१६-२६, मार्क १०:१७-२७, लूक १८:१८-२७)

दुसऱ्या एका वेळी, येशू खेड्यापाड्यातून फिरत असताना आणि लोकांना शिकवत असताना, एका माणसाने त्याला असाच प्रश्न विचारला, “प्रभू, तारले जातील ते थोडेच आहेत काय?”

येशू त्याला म्हणाला, “नाशाकडे नेणारा दरवाजा रुंद आणि मार्ग पसरट आहे, आणि त्यानं आत जाणारे पुष्कळ आहेत. पण जीवनाकडे नेणारा दरवाजा अरुंद आणि मार्ग संकुचित आहे, आणि तो ज्यांना सापडतो ते थोडे आहेत. म्हणून अरुंद दारानं आत जायला झटा, कारण पुष्कळ आत जायला पाहतील पण जाऊ शकणार नाहीत.” (मत्तय ७:१३-१४, लूक १३:२३-२४)

•

एकदा काही शास्त्री येशूबरोबर वादविवाद करत होते. तेव्हा त्यांच्यातील एकाने येशूला विचारले, “गुरू, नियमशास्त्रात कोणती आज्ञा मोठी आहे?”

येशूने त्याला उत्तर दिले, “पहिली ही आहे, ‘हे इस्राएला, ऐक, परमेश्वर, आपला देव परमेश्वर एक आहे आणि तुझा देव परमेश्वर ह्याच्यावर तू आपल्या पूर्ण मनाने, पूर्ण जिवाने, पूर्ण बुद्धीने आणि पूर्ण शक्तीने प्रीती कर.’ दुसरी ही आहे, ‘तू जशी आपल्यावर तशीच आपल्या शेजाऱ्यावर प्रीती कर.’ ह्यांपेक्षा आणखी कोणतीच मोठी आज्ञा नाही.” येशू हेही म्हणाला की, “ह्या दोन आज्ञांवर सर्व नियमशास्त्र आणि संदेष्टे अवलंबून आहेत.”

प्रश्न विचारणाऱ्याला येशूचे उत्तर पटले आणि तो म्हणाला, “बरोबर, गुरू, आपण हे खरं म्हटलं की, तो एक आहे, आणि त्याच्याशिवाय कोणी दुसरा नाही. आणि त्याच्यावर पूर्ण मनानं, पूर्ण बुद्धीनं आणि पूर्ण शक्तीनं प्रीती करणं, आणि जशी आपल्यावर

तशीच आपल्या शेजाऱ्यावर प्रीती करणं, हे सर्व होमार्पणांपेक्षा आणि बलिदानांपेक्षा अधिक आहे."

समंजसपणाने दिलेले हे उत्तर येशूला आवडले आणि त्याने म्हटले, "तू देवाच्या राज्यापासून दूर नाहीस." (मत्तय २२:३५-४०, मार्क १२:२८-३४)

•

# ६

# यहुदी लोकांबरोबर संवाद

येशू एकदा यरुशलेमातील मंदिराच्या भांडारासमोर उभा होता. भांडारात आपले दान अर्पण करायला येणाऱ्या स्त्री-पुरुषांची तेथे नेहमीच वर्दळ असायची. अशा ह्या गजबजलेल्या जागी जेव्हा येशू बोलू लागला तेव्हा साहजिकच त्याच्याभोवती लोकांची गर्दी जमली. येशूने सुरुवात केली, "मी जगाचा प्रकाश आहे. जो माझ्यामागं येतो तो अंधारात चालणार नाही, पण त्याच्याजवळ जीवनाचा प्रकाश राहील." आणि त्यानंतर येशूचा यहुदी लोकांबरोबर एक प्रदीर्घ संवाद सुरु झाला. (योहान ८:१२-५९)

तेथे उपस्थित असलेल्या परोश्यांना येशूने केलेला एवढा मोठा दावा मान्य नव्हता. ते त्याला म्हणाले, "तू तर स्वतःविषयीच साक्ष देत आहेस. तुझी साक्ष खरी नाही."

येशूने त्यांना सांगितले, "मी स्वतःविषयी साक्ष दिली तरी माझी साक्ष खरी आहे, कारण मी कुठून आलो आणि कुठं जाणार हे मला माहीत आहे. पण मी कुठून आलो आणि कुठं जाणार हे तुम्हाला माहीत नाही. तुम्ही देहानुसार न्याय करता, मी कुणाचा न्याय करीत नाही. आणि तरी मी न्याय करतो, तर माझा न्याय खरा आहे. कारण मी एकटा नाही, पण मी आणि मला धाडणारा, असे आम्ही आहो. तुमच्या नियमशास्त्रातपण लिहिलं आहे की, दोघांची साक्ष

खरी असते. माझ्याविषयी साक्ष देणारा मी एक आहे, आणि मला धाडणारा पिता माझ्याविषयी साक्ष देतो."

येशूचे म्हणणे हे होते की, यहुद्यांना जर दोन साक्षीदार हवे असतील, तर तो एक साक्षीदार आहे आणि दुसरा त्याचा पिता आहे.

परोशीः "तुझा पिता कुठं आहे?"

येशूः "तुम्ही मला किंवा माझ्या पित्यालाही ओळखीत नाही. तुम्ही मला ओळखलं असतं तर माझ्या पित्यालाही ओळखलं असतं. मी निघून जाईन, आणि तुम्ही माझा शोध कराल, आणि तुमच्या पापात मराल. मी जाईन तिकडे तुम्हाला येता येणार नाही."

यहुदीः "हा आत्महत्या करणार काय? कारण हा म्हणतो की, 'मी जाईन तिकडे तुम्हाला येता येणार नाही '."

येशूः "तुम्ही खालचे आहा, मी वरचा आहे. तुम्ही ह्या जगाचे आहा, मी ह्या जगाचा नाही. म्हणून मी तुम्हाला म्हटलं, तुम्ही तुमच्या पापांत मराल. कारण मी तो आहे असा तुम्ही विश्वास ठेवला नाही, तर तुम्ही तुमच्या पापांत मराल."

यहुदीः "तू कोण आहेस?"

येशूः "मी तुम्हाला तेच प्रारंभापासून सांगतो. तुमच्याविषयी बोलायला आणि न्याय करायला पुष्कळ गोष्टी माझ्याजवळ आहेत. पण ज्यानं मला धाडलं तो खरा आहे आणि मी त्याच्याकडून ऐकलेल्या गोष्टी जगाला सांगतो."

तो त्यांच्याशी पित्याविषयी बोलत होता हे त्यांना कळले नाही. तेव्हा येशू त्यांना म्हणाला, "तुम्ही जेव्हा मनुष्याच्या पुत्राला वर चढवाल तेव्हा तुम्हाला हे कळेल की, मी तो आहे, आणि मी स्वतः काही करीत नाही, पण पित्यानं मला सांगितल्याप्रमाणं मी हे करतो. आणि मला ज्यानं धाडलं तो माझ्याबरोबर आहे. त्यानं मला एकटं सोडलं नाही. कारण मी नेहमी त्याला आवडणाऱ्या गोष्टी करतो."

येशू हे बोलत असताना पुष्कळ जणांनी त्याच्यावर विश्वास ठेवला. ज्या यहुद्यांनी त्याच्यावर विश्वास ठेवला होता त्यांना येशू म्हणाला, "तुम्ही माझ्या वचनात राहिला तर खरोखर माझे शिष्य आहा. तुम्हाला सत्य समजेल, आणि सत्य तुम्हाला स्वतंत्र करील."

यहुदीः "आम्ही अब्राहामाचे संतान आहो, आणि कधी कोणाचे दास झालो नाही. तू आम्हाला कसा म्हणतोस की, 'तुम्ही स्वतंत्र केले जाल'?"

येशूः "मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो, जो कोणी पाप करतो तो पापाचा दास आहे. दास सदैव घरात रहात नाही, पुत्र सदैव घरात राहतो. म्हणून जर पुत्रानं तुम्हाला स्वतंत्र केलं तर तुम्ही खरोखर स्वतंत्र व्हाल. मी जाणतो की, तुम्ही अब्राहामाचे वंशज आहा, पण मला ठार मारायला टपला आहा. कारण माझ्या वचनाला तुमच्यात वाव मिळत नाही. मी माझ्या पित्याजवळ पाहिलं ते बोलतो, आणि तुम्ही तुमच्या पित्याकडून ऐकलं ते करता."

यहुदीः "अब्राहाम आमचा पिता आहे."

येशूः "तुम्ही अब्राहामाची मुलं आहा तर अब्राहामाच्या कृती करा. पण मी जे सत्य देवाकडून ऐकलं, ते तुम्हाला सांगणाऱ्या मला

तुम्ही ठार मारायला पाहता. हे अब्राहामानं केलं नाही. तुम्ही तुमच्या पित्याच्या कृती करता."

**यहुदीः** "आम्ही जारकर्मानं जन्मलो नाही, आम्हाला एक पिता आहे. तो देव आहे."

**येशूः** "देव तुमचा पिता असता तर तुम्ही माझ्यावर प्रीती केली असती. कारण मी देवापासून निघालो आणि आलो, आणि स्वतः होऊन आलो नाही, पण त्यानं मला पाठवलं. माझं बोलणं तुम्हांला का कळत नाही? कारण तुम्हाला माझं वचन ऐकवत नाही. तुम्ही ज्याचे आहात तो सैतान तुमचा पिता आहे, आणि तुमच्या पित्याच्या वासनांप्रमाणं करावं ही तुमची इच्छा आहे. तो प्रारंभापासून खुनी आहे. तो सत्यात राहिला नाही, कारण त्याच्यात सत्य नव्हतं. तो जेव्हा असत्य सांगतो तेव्हा तो स्वतःचं सांगतो कारण तो लबाड आहे आणि असत्याचा जनक आहे. आणि, मी सत्य सांगतो म्हणून तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवीत नाही. तुमच्यातला कोण मला पापाचा दोष लावील? आणि मी जर सत्य सांगतो तर तुम्ही माझ्यावर का विश्वास ठेवीत नाही? जो देवाकडचा आहे तो देवाची वचनं ऐकतो. म्हणून तुम्ही ऐकत नाही, कारण तुम्ही देवाकडचे नाही."

**यहुदीः** "तू शोमरोनी आहेस, आणि तुझ्यात भूत आहे, हे आम्ही बरोबर म्हणतो ना?"

**येशूः** "माझ्यात भूत नाही, पण मी माझ्या पित्याला मान देतो आणि तुम्ही माझा अपमान करता. पण मी माझं स्वतःचं गौरव पहात नाही. जो ते पाहतो आणि न्याय करतो असा एक आहे. मी

तुम्हाला सत्य सत्य सांगतो, कोणी माझी वचनं पाळील तर तो कधीच मरण पाहणार नाही.”

यहुदीः “आता आम्हाला कळलं की, तुझ्यात भूत आहे. अब्राहाम मेला आणि संदेष्टे मेले. आणि तू म्हणतोस की, ‘कोणी माझं वचन पाळील तर तो कधी मरण अनुभवणार नाही ’. आमचा पिता अब्राहाम मेला. त्याच्यापेक्षा तू मोठा आहेस काय? आणि संदेष्टे मेले. तू स्वतःला काय बनवतोस?”

येशूः “मी स्वतःचं गौरव केलं तर माझं गौरव काही नाही, पण जो तुमचा देव आहे असं ज्याच्याविषयी तुम्ही म्हणता तो माझा पिता माझं गौरव करतो. तरी, तुम्ही त्याला जाणलेलं नाही, पण मी त्याला ओळखतो. आणि मी जर म्हटलं की, मी त्याला ओळखीत नाही, तर मी तुमच्यासारखा लबाड होईन. पण, मी त्याला ओळखतो, आणि त्याचं वचन पाळतो. माझा दिवस बघायला तुमचा पिता अब्राहाम उल्लासला. त्यानं तो बघितला आणि तो आनंदित झाला.”

यहुदीः “तू अजून पन्नास वर्षांचा नाहीस आणि अब्राहामाला पाहिलंस काय?”

येशूः “मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो, अब्राहाम झाल्या-अगोदर मी आहे.”

तेव्हा त्यांनी त्याच्यावर टाकायला दगड उचलले, पण येशू दडला आणि मंदिरामधून बाहेर गेला. (योहान ८:१२-५९)

•

येथे हे लक्षात घेणे महत्वाचे आहे की, येशू म्हणाला नाही की, “अब्राहाम झाल्याअगोदर मी होतो.” तो म्हणाला, “अब्राहाम झाल्याअगोदर मी आहे.” कारण येशूसाठी भूतकाळ, वर्तमानकाळ किंवा भविष्यकाळ असा काही फरक नाही. त्याच्यावर काळाचे बंधन नाही. जगाच्या प्रारंभापासून तो आहे. (योहान १:१) येशू ख्रिस्त काल, आज आणि युगानुयुग सारखाच आहे. (इब्री. १३:७)

•

# ७

# प्रथा आणि प्रश्न

**शास्त्री**, परोशी आणि सदोकी येशूकडे वारंवार यायचे आणि त्याला प्रश्न विचारायचे. ते कधी एकमेकांबरोबर येत तर कधी वेगवेगळे. शास्त्री त्यांच्या नावाप्रमाणे धर्मशास्त्रात पारंगत होते. नियमशास्त्राचे त्यांना सखोल ज्ञान होते. सदोकी पंथातील लोक धनवान होते आणि ते वरिष्ठ याजकासारखी उच्च पदे भूषवीत असता. त्या वेळी इस्त्राएलावर रोमी हुकमत होती आणि सदोकी लोक रोमी अधिकाऱ्यांशी जुळते घेत असत. त्यामुळे सामान्य माणसांचे सदोक्यांशी फार जवळचे संबंध नव्हते. उलट सामान्य लोक परोश्यांना आदराने आणि मानापानाने वागवायचे. पण परोश्यांचा भर नियमशास्त्राच्या काटेकोर पालनावर असायचा. त्याशिवाय परंपरा, रूढी आणि प्रथा ह्यांनाही ते तितकेच महत्व देत असत.

शास्त्री, परोशी आणि सदोकी ह्यांच्यांत मतभेद असले तरी येशूला विरोध करण्यासाठी ते एकत्र यायला तयार असत. त्याच्याशी तात्विक वादविवाद करून त्याला त्याच्याच शब्दांत पकडण्याचा त्यांचा अप्रामाणिक हेतू असायचा. येशूला ह्याची जाणीव असायची आणि त्यांचा बेत बहुतेक असफल व्हायचा. पण शेवटी त्यांनी येशूला मरणाची शिक्षा द्यायचा कट रचला आणि त्यात ते यशस्वीपण झाले.

•

येशू एका पहाटेस मंदिरात गेला असता खूप लोक त्याच्याभोवती जमले आणि तो खाली बसून त्यांना शिकवू लागला. तेव्हा काही शास्त्री आणि परोशी एका बाईला तेथे घेऊन आले आणि त्यांनी तिला त्याच्यासमोर, लोकांच्या मध्यभागी, उभे केले. मग ते येशूला म्हणाले, "गुरू, ही बाई व्यभिचारकर्मात धरली गेली. आता अशांना दगडमार करावा, म्हणून मोशेनं नियमशास्त्रात आम्हाला आज्ञा दिली आहे. पण आपण काय म्हणता?"

खरे तर येशूवर काही आरोप करायला मिळावा म्हणून हा प्रश्न त्यांनी विचारला होता. आधी येशू काहीच बोलला नाही. तो खाली वाकून आपल्या बोटाने जमिनीवर काही तरी लिहू लागला. पण ते जेव्हा त्याला विचारतच राहिले तेव्हा तो सरळ बसला आणि त्यांना म्हणाला, "तुमच्यात जो कोणी निष्पाप असेल त्यानं प्रथम तिच्यावर एक दगड टाकावा." मग तो पुन्हा खाली वाकला आणि आपल्या बोटाने जमिनीवर लिहू लागला.

पण येशूने सांगितल्याप्रमाणे करायचे कोणाचेच धैर्य झाले नाही. तेथे असलेले सगळे लोक, वडील माणसांपासून लहानांपर्यंत, एकामागून एक निघून गेले. शेवटी येशू एकटाच राहिला आणि ती बाई मात्र त्याच्यासमोर तशीच उभी असलेली त्याने पाहिली. तेव्हा येशूने तिला विचारले, "बाई, तुला कुणी दोषी ठरवलं नाही काय?"

ती म्हणाली, "कुणी नाही, प्रभू."

येशू तिला म्हणाला, "मीपण तुला दोषी ठरवीत नाही. जा, ह्यापुढं पाप करू नकोस." (योहान ८:१-११)

•

येशू कपर्णहूमला आला असता तो ज्या घरात होता तेथे दारापुढे मोठी गर्दी जमली होती. एका पक्षघाती मनुष्याला चौघे जण उचलून घेऊन आले होते. त्यांनी घरातील धाबे उस्तरले आणि ते फोडून तो पक्षघाती मनुष्य ज्यावर पडून होता ते बाजले त्यांनी खाली सोडले. येशूने त्यांचा विश्वास बघून त्या पक्षघात झालेल्या मनुष्याला म्हटले, "मुला, तुझ्या पापांची क्षमा केली आहे."

पण तेथे जे शास्त्री बसले होते ते विचार करू लागले, "हा असं कसं बोलतो? हे तर दुर्भाषण आहे! एका देवाशिवाय दुसरा कोण पापांची क्षमा करू शकतो?"

येशूने त्यांचे विचार औळखून त्यांना म्हटले, "तुम्ही का आपल्या मनात असल्या गोष्टीचा विचार करता? ह्या पक्षघाती मनुष्याला 'तुझ्या पापांची क्षमा केली आहे ' असं म्हणणं, किंवा 'ऊठ, तुझं बाजलं उचल आणि चाल ', असं म्हणणं अधिक सोपं आहे? पण मनुष्याच्या पुत्राला पृथ्वीवर पापांची क्षमा करायचा अधिकार आहे हे तुम्हाला समजावं."

मग येशू त्या पक्षघाती मनुष्याला म्हणाला, "मी तुला सांगतो, ऊठ, तुझं बाजलं उचल आणि तुझ्या घरी जा."

तो उठला, त्याने लगेच आपले बाजले उचलले, आणि तो त्या सर्वांसमोर बाहेर निघाला. त्यामुळे ते सगळे आश्चर्यचकित झाले आणि देवाचे गौरव करून म्हणाले, "आम्ही असं कधीच बघितलं नव्हतं." (मार्क २:१-१२, लूक ५:१७-२६)

•

लोकांनी एकदा येशूला विचारले, “योहानाचे शिष्य आणि परोश्यांचे शिष्य उपास करतात पण आपले शिष्य उपास का करीत नाहीत?”

येशू त्यांना म्हणाला, “वऱ्हाड्यांबरोबर वर असताना ते उपास करू शकतील काय? त्यांच्याबरोबर वर असताना ते उपास करू शकणार नाहीत  पण वर त्यांच्यामधून काढला जाईल तेव्हा ते दिवस येतील, आणि मग त्या दिवशी ते उपास करतील. कोणी कोऱ्या कापडाचं ठिगळ जुन्या कपड्यावर लावीत नाहीत. नाहीतर, भरीचा तुकडा त्यातून उसकटतो, नवा जुन्यातून, आणि फाटकं अधिक वाईट होतं. आणि कोणी नवा द्राक्षारस जुन्या बुधल्यांत भरीत नाहीत. नाहीतर, तो द्राक्षारस ते बुधले फोडील. मग द्राक्षारस आणि बुधले नष्ट होतात. पण नवा द्राक्षारस नव्या बुधल्यात भरतात.”

पुन्हा एकदा शास्त्री आणि परोशी येशूला म्हणाले, “आपले शिष्य पूर्वजांची प्रथा का मोडतात? कारण ते भाकरी खातात तेव्हा ते हात धूत नाहीत.”

येशूने त्यांना म्हटले, “तुम्हीसुद्धा तुमच्या प्रथेनं देवाची आज्ञा का मोडता? ऐका आणि विचार करा. जे तोंडात जातं ते माणसाला विटाळवीत नाही, पण जे तोंडातून बाहेर येतं ते माणसाला विटाळवितं.” (मत्तय ९:१४-१७, १५:१-२०, मार्क २:१८-२२, ७:१-२३, लूक ५:३३-३९)

•

येशू त्याच्या शिष्यांबरोबर चालला असताना त्यांना वाटेत काही शेतांमधून जावे लागले. त्याच्या शिष्यांना भूक लागली होती आणि ते शेतातली कणसे तोडून घेऊन खाऊ लागले. पण तो शब्बाथ दिवस होता आणि परोश्यांनी ते बघितले. ते येशूला म्हणाले, “बघा, आपले शिष्य शब्बाथ दिवशी जे करणं योग्य नाही ते करीत आहेत.”

पण येशूने त्यांनाच विचारले, “जेव्हा दाविदाला आणि त्याच्याबरोबर जे होते त्यांना भूक लागली होती तेव्हा त्यानं काय केलं हे तुम्ही वाचलं नाही काय? तो देवाच्या मंडपात कसा गेला आणि ज्या समर्पित भाकरी, केवळ याजकाशिवाय, त्यानं किंवा त्याच्याबरोबर जे होते त्यांनी खाणं योग्य नव्हतं त्या त्यानं कशा खाल्ल्या? किंवा शब्बाथ दिवशी याजक मंदिरात शब्बाथ मोडून निर्दोष राहतात हे तुम्ही नियमशास्त्रात वाचलं नाही काय? पण मी तुम्हाला सांगतो, मंदिरापेक्षा इथं काही अधिक आहे. ‘मला दया पाहिजे, बलिदान नको ’ ह्याचा अर्थ काय आहे हे तुम्हाला कळलं असतं तर तुम्ही निर्दोष्यांना दोषी ठरवलं नसतं. कारण मनुष्याचा पुत्र शब्बाथाचा धनी आहे.”

त्यानंतर येशू तेथून निघाला आणि त्यांच्या सभास्थानात गेला. तेथे एक मनुष्य होता ज्याचा एक हात वाळलेला होता. येशूवर पुन्हा आरोप करता यावा म्हणून परोश्यांनी त्याला विचारले, “शब्बाथ दिवशी कोणाला बरं करणं योग्य आहे काय?”

आणि पुन्हा येशूने त्यांना प्रतिप्रश्न केले, “शब्बाथ दिवशी चांगलं करणं योग्य आहे किंवा वाईट करणं? जीव वाचवणं किंवा मारणं? तुमच्यात कोण असा मनुष्य असेल की, त्याच्याजवळ एक

मेंढरू आहे, आणि शब्बाथ दिवशी ते खाचेत पडलं तर तो त्याला धरून वर उचलणार नाही? मग मेंढरापेक्षा मनुष्य किती अधिक आहे? म्हणून शब्बाथ दिवशी चांगलं करणं योग्य आहे."

नंतर येशू त्या माणसाला म्हणाला, "तुझा हात पुढं कर." त्याने तो पुढे केला, आणि तो हात दुसऱ्या हातासारखा नीट बरा झाला. (मत्तय १२:१-१३, मार्क २:२३-३:६, लूक ६:१-११)

•

परोश्यांनी एकदा येशूला प्रश्न विचारला, "कोणी कोणत्याही कारणावरून आपल्या बायकोला सोडणं योग्य आहे काय?"

येशूने त्यांना उत्तर दिले, "तुम्ही हे वाचलं नाही काय की, ज्यानं प्रारंभापासून त्यांना उत्पन्न केलं त्यानं त्यांना नर आणि नारी असं केलं. आणि म्हटलं की, 'ह्या कारणामुळे पुरुष आपल्या बापाला आणि आईला सोडील आणि आपल्या बायकोशी जडून राहील; आणि ती दोघे एकदेह होतील'? तर मग ती दोन नाहीत, पण एकदेह आहेत. म्हणून देवानं जे जोडलं आहे ते मनुष्यानं तोडू नये."

त्यावर त्यांनी आणखी एक प्रश्न विचारला, "मग सोडचिठ्ठी देऊन तिला सोडायला मोशेनं आज्ञा का दिली?"

येशूचे उत्तर होते, "तुमच्या मनाच्या कठिणपणामुळं मोशेनं तुम्हाला तुमच्या बायका सोडायला परवानगी दिली. पण प्रारंभापासून तसं झालं नाही. आणि मी तुम्हाला सांगतो, जो कोणी आपल्या बायकोला जारकर्माच्या कारणाशिवाय सोडील आणि दुसरीशी लग्न करील तो व्यभिचार करतो." (मत्तय १९:३-९, मार्क १०:२-९)

सदोकी पंथाच्या लोकांचा पुनरुत्थान किंवा मृत्यूनंतरच्या जीवनात विश्वास नव्हता. तरीपण ते येशूकडे पुनरुत्थानाविषयी एक गुंतागुंतीचा प्रश्न घेऊन आले. त्यांनी येशूपुढे एक असंभाव्य कथानक सादर केले. ते म्हणाले,

“गुरू, मोशेनं म्हटलं आहे की, जर कोणी मनुष्य त्याला मुलं नसताना मेला तर त्याच्या भावानं त्याच्या बायकोशी लग्न करून आपल्या भावासाठी संतान उभं करावं. आता, आमच्यात असे सात भाऊ होते. पहिल्यानं लग्न केलं आणि तो मेला. त्याला संतान नसल्यामुळं त्यानं आपली बायको आपल्या भावाला ठेवली. त्याप्रमाणंच दुसरा, तिसरा आणि सातव्यापर्यंत सगळे मेले. आणि त्या सगळ्यांच्या मागून ती बाईपण मेली.”

मग येशूला पेचात टाकण्यासाठी सदोक्यांनी प्रश्न विचारला, “तर ती पुनरुत्थानात त्या सातांतून कोणाची बायको होईल? कारण ती त्या सर्वांची झाली होती.”

पण येशूने त्यांना एक अनपेक्षित उत्तर दिले. तो म्हणाला, “तुम्ही शास्त्रलेख आणि देवाचं सामर्थ्य जाणत नाही, म्हणून चुकत आहा. कारण ते पुनरुत्थानात लग्न करीत नाहीत किंवा लग्न करून देत नाहीत. पण स्वर्गातील देवदूतांसारखे होतात.” आणि मग येशूने विचारले, “पण मेलेल्यांच्या पुन्हा उठण्याविषयी देवानं तुम्हाला सांगितलं आहे ते तुम्ही वाचलेलं नाही काय? त्यानं म्हटलं आहे की, ‘मी अब्राहामाचा देव, इसहाकाचा देव आणि याकोबाचा देव आहे.’ देव हा मृतांचा देव नाही, पण जिवंतांचा आहे.”

येशूने सदोक्यांना त्यांचा प्रश्न मुळातच चुकीचा असल्याचे सांगितले आणि त्याने त्यांचे अज्ञान त्यांना दाखवून दिले. कित्येकांना येशूचे बोलणे पटले आणि ते म्हणाले, "गुरू, आपण बरोबर बोललात." (मत्तय २२:२३-३२, मार्क १२:१८-२७, लूक २०:२७-४०)

•

परोश्यांनी येशूला विचारले, "देवाचं राज्य कधी येईल?"

येशूने त्यांना उत्तर दिले, "देवाचं राज्य निरीक्षणात येणार नाही. आणि 'इथं बघा', किंवा 'तिथं बघा' असंदेखील ते म्हणणार नाहीत. कारण बघा, देवाचं राज्य तुमच्यात आहे." (लूक १७:२०-२१)

•

येशू यरुशलेमातील मंदिरात शिकवत असताना वरिष्ठ याजक, शास्त्री आणि लोकांचे वडील त्याच्याकडे आले आणि त्यांनी त्याला विचारले, "तू कोणत्या अधिकारानं ह्या गोष्टी करतोस? कोणी तुला हा अधिकार दिला?"

येशूने त्यांच्या प्रश्नाचे उत्तर देण्याऐवजी त्यांना एक अट घातली. तो म्हणाला, "मीपण तुम्हाला एक गोष्ट विचारतो. तुम्ही मला ती सांगाल, तर मी ह्या गोष्टी कोणत्या अधिकारानं करतो ते मी तुम्हाला सागेन." त्याचा प्रतिप्रश्न होता, "योहानाचा बाप्तिस्मा हा कुठून होता? स्वर्गाकडून की, मनुष्यांकडून?"

तेव्हा ते आपसात वाद घालू लागले, "आपण म्हटलं स्वर्गाकडून, तर तो आपल्याला म्हणेल, 'मग तुम्ही त्याच्यावर

विश्वास का ठेवला नाही?’ पण आपण जर म्हटलं, मनुष्यांकडून, तर लोक आपल्याला दगडमार करतील. कारण सर्व जण योहानाला संदेष्टा मानतात.”

शेवटी त्यांनी येशूला उत्तर दिले, “आम्हाला माहीत नाही.”

तेव्हा तो त्यांना म्हणाला, “मग मी ह्या गोष्टी कोणत्या अधिकारानं करतो ते मीपण तुम्हाला सांगत नाही.” (मत्तय २१:२३-२७, मार्क ११:२६-३३, लूक २०:१-८)

•

येशूला त्याच्याच बोलण्यात कसे पकडावे ह्यावर परोश्यांनी मसलत घेतली आणि काही लोकांना त्याच्याकडे धाडले. त्यांनी सुरुवातीला म्हटले, “गुरू, आम्ही जाणतो की, आपण खरे आहा आणि देवाचा मार्ग खरेपणानं शिकवता, आणि कोणाची पर्वा करीत नाही, कारण आपण माणसांचं बाह्यरूप पहात नाही.”

आणि मग त्यांनी येशूला त्यांचा प्रश्न विचारला, “आम्हाला सांगा, आपल्याला काय वाटतं? कैसराला कर देणं योग्य आहे की नाही?”

इस्त्राएल त्यावेळी रोमी सत्तेखाली होते आणि येशूने त्यांचा दुष्टपणा ओळखून त्यांना म्हटले, “अहो, ढोंग्यांनो, माझी परीक्षा का करता? मला एक कराचं नाणं दाखवा.” आणि त्यांनी त्याला एक दिनार आणून दिला. तेव्हा त्याने विचारले, “हा मुखवटा आणि वरचा लेख कोणाचा आहे?” ते म्हणाले, “कैसराचा.” तेव्हा येशूने उत्तर दिले, “तर कैसराचं आहे ते कैसराला द्या आणि देवाचं आहे ते देवाला द्या.” (मत्तय २२:१५-२२, लूक २०:२०-२६)

लोकांनी येशूला विचारले, “आम्ही देवाची कामं करावीत म्हणून काय करावं?”

तो म्हणाला, “देवाचं काम हे आहे की, त्यानं ज्याला पाठवलं आहे त्याच्यावर तुम्ही विश्वास ठेवावा.” (योहान ६:२८-२९)

•

अनेक लोकांना येशूचे शिक्षण आवडत नसे आणि ते त्याला ठार मारायची संधी शोधत असत. म्हणून तो लोकांना म्हणाला, “मोशेनं तुम्हाला नियमशास्त्र दिलं आहे ना? आणि तुमच्यातला कोणीही नियमशास्त्र पाळीत नाही. तुम्ही मला ठार मारायला का टपता?” पण त्यांनी आरोप केला, “तुझ्यात भूत आहे. कोण तुला ठार मारायला टपतो आहे?”

येशूने उत्तर दिले, “मी एक काम केलं, आणि तुम्ही सगळे आश्चर्य करता. मोशेनं ह्याकरता तुम्हाला सुनत लावून दिली. तरी ती मोशेपासून नाही, पण पूर्वजांपासून आहे. आणि तुम्ही शब्बाथ दिवशी मनुष्याची सुनत करता. मोशेचं नियमशास्त्र मोडू नये म्हणून जर शब्बाथ दिवशी मनुष्याला सुनत मिळते, तर मी शब्बाथ दिवशी एका मनुष्याला सर्वांगी निरोगी केलं म्हणून तुम्ही माझ्यावर रागावता काय? दिसतं त्यावरून न्याय करू नका, पण उचित न्यायानं न्याय करा.” (योहान ७:१९-२४)

•

# ८
# वैयक्तिक संवाद

**देवाने** संपूर्ण सृष्टीची निर्मिती केली असली, आणि तो सर्व मानवांचा पिता असला, तरी तो आपल्या प्रत्येकाचा वैयक्तिक देवसुद्धा आहे. देव आपल्या प्रत्येकाला नावाने ओळखतो, आपल्या जीवनक्रमावर त्याचे लक्ष असते, आपल्या सुखदुःखांत तो सहभागी होतो, आपल्याला तो कधीही सोडत नाही, आपल्या आयुष्यासाठी त्याची एक योजना असते.

प्रभू येशूने जे काही केले, तो जे काही बोलला, त्यातून देवपित्याचे हे रूप आपल्यापुढे उभे राहते. येशू केवळ विद्वानां-बरोबर तात्विक बाबींविषयी चर्चा करायचा, असे मुळीच नाही. तो सामान्य लोकांबरोबरही सामान्य गोष्टींविषयी बोलत असे, त्यांच्या वैयक्तिक समस्यासुद्धा तो सोडवत असे. हे संवाद जेव्हा आपण वाचतो तेव्हा त्यांतून आपल्यालाही बरेच काही शिकायला मिळते.

•

येशू एका खेड्यातून जात असताना मार्था नावाच्या एक बाईने त्याला आपल्या घरी येण्याचे आमंत्रण दिले. तो तिच्या घरी गेल्यावर तिची बहीण मरिया प्रभूच्या चरणी बसून त्याचे बोलणे ऐकण्यात मग्न झाली. पण मार्था मात्र घरची कामे करता करता थकून गेली आणि येशूला म्हणाली,

"प्रभू, माझ्या बहिणीनं मला एकटीला सगळं काम करायला सोडलं ह्याची आपण काही पर्वा करीत नाही का? तिला सांगा ना मला मदत करायला."

येशूने तिला उत्तर दिले, "मार्था, मार्था, तू पुष्कळ गोष्टींच्या काळजीत आणि गोंधळात आहेस. पण एकाच गोष्टीची गरज आहे, कारण मरियेने चांगला भाग निवडला आहे. तो तिच्याकडून काढून घेतला जाणार नाही." (लूक १०:३८-४२)

•

एकदा येशू आणि त्याचे शिष्य मचव्यातून प्रवास करीत होते. अचानक समुद्रात मोठे वादळ उद्‌भवले आणि मचव्यावर लाटा आदळू लागल्या. पण येशू झोपलेला होता. तेव्हा शिष्य घाबरले आणि त्याला उठवून म्हणाले,

"गुरू, आपण बुडतोत ह्याची आपल्याला काळजी नाही का?"

तो त्यांना म्हणाला, "अहो तुम्ही अल्पविश्वासी, तुम्ही असे भितरे कसे? " तो उठला आणि त्याने वाऱ्याला दटावले, आणि समुद्राला म्हटले, "उगा रहा, शांत हो."

तेव्हा मोठी स्तब्धता आली. शिष्यांनी आश्चर्य केले आणि म्हटले, "हा कसा मनुष्य आहे की, वारे आणि समुद्रदेखील ह्याचं ऐकतात." (मत्तय ८:२३-२७, मार्क ४:३५-४१, लूक ८:२२-२५)

•

येशू शोमरोनामधून प्रवास करत असताना सुखार नावाच्या एका गावी आला होता. ते ठिकाण याकोबाने आपला मुलगा योसेफ ह्याला दिलेल्या शेताजवळ होते. तेथे याकोबाची विहीर होती.

प्रवासाने दमलेला येशू एकटाच त्या विहिरीजवळ बसला, कारण त्याचे शिष्य गावात काही खायचे पदार्थ विकत घ्यायला गेले होते. तेथे एक शोमरोनी बाई पाणी शेंदायला आली तेव्हा येशू तिला म्हणाला, "मला प्यायला दे."

यहुदी आणि शोमरोनी लोक एकमेकांबरोबर संबंध ठेवत नसत किंवा एकमेकांत व्यवहार करत नसत. म्हणून तिला आश्चर्य वाटले आणि तिने येशूला विचारले, "आपण यहुदी असूनसुद्धा माझ्याजवळून पाणी प्यायला मागता, हे कसं?"

येशूने तिला म्हटले, "देवाचं दान काय आहे, आणि 'मला प्यायला दे' असं तुला म्हणणारा कोण आहे, हे तुला समजलं असतं तर तू त्याच्याजवळ जिवंत पाणी मागितलं असतंस आणि त्यानं ते तुला दिलं असतं."

शोमरोनी बाईः "महाराज, आपल्याजवळ शेंदायला काही नाही, आणि विहीर खोल आहे, मग आपल्याजवळ ते जिवंत पाणी कुठून? आपले पूर्वज याकोब ह्यांच्याहून आपण मोठे आहा काय? त्यांनी ही विहीर आम्हाला दिली आणि ते स्वतः, त्यांचे पुत्र, आणि त्यांची जनावरं हिचं पाणी पीत असत."

येशूः "जो कोणी हे पाणी पिईल त्याला पुन्हा तहान लागेल, पण जो मनुष्य मी त्याला देईन ते पाणी पिईल त्याला कधीही तहान लागणार नाही. तर मी जे पाणी त्याला देईन ते त्याच्या ठायी जीवनासाठी उपळत्या पाण्याचा झरा होईल."

शोमरोनी बाईः "महाराज, मला ते पाणी द्या, म्हणजे मला तहान लागणार नाही, आणि मी इथं शेंदायला येणार नाही."

पण येशूने विषय बदलला. तो म्हणाला, “जा, तुझ्या नवऱ्याला बोलव, आणि इकडे ये.”

शोमरोनी बाईः “मला नवरा नाही.”

येशूः “तू ठीक बोललीस की, ‘मला नवरा नाही ’. कारण तुला पाच नवरे होते, आणि तुझ्याजवळ आता आहे तो तुझा नवरा नाही. हे तू खरं बोललीस.”

ऱ्शोमरोनी बाईः “महाराज, मी समजते की, आपण कोणी संदेष्टे आहा. आमचे पूर्वज ह्या डोंगरावर उपासना करीत आणि तुम्ही म्हणता की, जिथं उपासना केली पाहिजे ते स्थान यरुशलेमात आहे.”

येशू म्हणाला, “बाई, माझ्यावर विश्वास ठेव. तुम्ही ह्या डोंगरावर आणि यरुशलेमातही पित्याची उपासना करणार नाही, अशी घटका येत आहे. तुम्ही ज्याला ओळखीत नाही त्याची उपासना करता, आम्ही ज्याला ओळखतो त्याची उपासना करतो. कारण यहुद्यांतून तारण आहे. पण जेव्हा खरे उपासक आत्म्यानं आणि खरेपणानं पित्याची उपासना करतील अशी घटका येत आहे, आणि आता आलीच आहे, कारण अशांनी आपली उपासना करावी अशी पित्याची इच्छा आहे. देव आत्मा आहे, आणि जे त्याची उपासना करतात त्यांनी आत्म्यानं आणि खरेपणानं त्याची उपासना केली पाहिजे.”

येशूचे हे बोलणे ऐकून ती बाई येशूला म्हणाली, “मी जाणते की, मशिहा म्हणजे ख्रिस्त येणार आहे. तो येईल तेव्हा तो सर्व गोष्टी आम्हाला सांगेल.”

शेवटी येशूने तिला सांगितले, "तुझ्याशी बोलणारा मी तो आहे." (योहान ४:४-२६)

•

य़ेशू एकदा लोकांशी बोलत असताना त्याची आई आणि त्याचे भाऊ बाहेर उभे होते आणि त्याच्याशी बोलायची त्यांची इच्छा होती. तेव्हा एक जण त्याला म्हणाला, "बघा, आपली आई आणि आपले भाऊ बाहेर उभे आहेत, आणि आपल्याशी बोलायची त्यांची इच्छा आहे."

पण येशूला त्याला विचारले, "माझी आई कोण आहे? आणि माझे भाऊ कोण आहेत?"

आणि आपल्या शिष्यांकडे आपला हात पुढे करून येशूने म्हटले, "बघा, माझी आई आणि माझे भाऊ! कारण, जो कोणी माझ्या स्वर्गातील पित्याच्या इच्छेप्रमाणे करील तोच माझा भाऊ, माझी बहीण आणि माझी आई." (मत्तय १२:४६-५०, मार्क ३:३१-३५)

•

येशूच्या बारा शिष्यांपैकी एक शिष्य शिमोन पेत्र ह्याने एकदा येशूला प्रश्न विचारला, "आम्ही सर्व सोडून तुझ्यामागं आलो आहोत त्या आम्हाला काय मिळेल?"

तेव्हा येशू त्याला म्हणाला, "मी तुम्हाला सत्य सांगतो, नव्या उत्पत्तीत मनुष्याचा पुत्र आपल्या गौरवी राजासनावर बसेल तेव्हा माझ्यामागं आलेले तुम्हीसुद्धा बारा राजासनांवर बसाल आणि इस्राएलाच्या बारा कुळांचा न्याय कराल. आणि माझ्या नावाकरता,

घरं किंवा भाऊ किंवा बहिणी, किंवा बाप किंवा आई किंवा मुलं, किंवा शेतं सोडणाऱ्या प्रत्येक मनुष्याला अनेकपट अधिक मिळेल आणि सनातन जीवन हे वतन मिळेल. पण पुष्कळ पहिले शेवटले होतील आणि शेवटले पहिले होतील." (मत्तय १९:२७-३०)

•

येशूचे शिष्य त्याच्याकडे आले आणि त्यांनी त्याला प्रश्न विचारला, "स्वर्गाच्या राज्यात सर्वांत मोठा कोण?"

येशूने एका लहान बालकाला आपल्याकडे बोलावले आणि त्याला त्यांच्या मध्यभागी बसवले. आणि मग त्याने शिष्यांना म्हटले,

"मी तुम्हाला सत्य सांगतो, तुमचा पालट होऊन तुम्ही बालकांसारखे झाल्याशिवाय स्वर्गाच्या राज्यात तुम्ही प्रवेश करणार नाही. कारण जो कोणी स्वतःला ह्या बालकांप्रमाणे लीन करील तो स्वर्गाच्या राज्यात सर्वांत मोठा आहे." (मत्तय १८:१-४)

•

येशूने बोध केला, "तुझ्या भावानं जर तुझा अपराध केला, तर जा, आणि तू त्याच्याबरोबर एकटा असताना त्याला त्याचा दोष दाखव. आणि त्यानं जर तुझं ऐकलं तर तू आपला भाऊ मिळवलास."

त्यावर पेत्राने त्याला प्रश्न विचारला, "प्रभू, माझ्या भावानं किती वेळा माझ्याविरुद्ध पाप करावं, आणि मी त्याला क्षमा करावी? सात वेळा?"

येशू त्याला म्हणाला, “मी तुला म्हणत नाही की, सात वेळा, पण सातांच्या सत्तर वेळा.” (मत्तय १८:१५-२२)

जब्दीचे पुत्र योहान आणि याकोब हे येशूच्या बारा शिष्यांपैकी होते. एकदा त्यांची आई त्यांच्याबरोबर येशूकडे आली आणि तिने येशूला नमन केले. येशूने तिला विचारले, “तुला काय पाहिजे?”

ती त्याला म्हणाली, “तुझ्या राज्यात माझ्या ह्या दोन मुलांनी, एकानं तुझ्या उजवीकडे आणि एकानं डावीकडे बसावं अशी आज्ञा दे.”

पण येशूने उत्तर दिले, “तुम्ही काय मागता हे तुम्ही जाणत नाही. मी जो प्याला पिणार आहे तो तुम्हाला पिता येईल?”

ते म्हणाले, “हो, येईल.”

येशू म्हणाला, “तुम्ही खरोखर माझा प्याला प्याल, पण माझ्या उजवीकडे आणि डावीकडे बसायला द्यायचं माझ्या हाती नाही. पण पित्यानं ज्यांच्यासाठी हे सिद्ध केलं आहे, त्यांच्यासाठी ते आहे.”

बाकी दहा शिष्यांनी हे ऐकले तेव्हा त्यांना त्या दोन भावांचा राग आला. पण येशूने त्यांना आपल्याकडे बोलवून म्हटले, “परजनांचे अधिकारी त्यांच्यावर धनीपण चालवतात तसं तुमच्यात होणार नाही. तुमच्यात जो कोणी मोठा होऊ इच्छील, त्यानं तुमचा सेवक व्हावं. आणि तुमच्यात जो काणी पहिला होऊ इच्छील त्यानं सर्वांचा दास व्हावं. तसाच मनुष्याचा पुत्रदेखील सेवा करून

घ्यायला नाही, पण सेवा करायला, आणि पुष्कळांसाठी खंडणी म्हणून आपला जीव द्यायला आला." (मत्तय २०:२०-२८)

•

येशू आणि त्याचे शिष्य पायी चालत असता त्यांनी एका माणसाला बघितले जो जन्मापासून अंधळा होता. त्याची ती अवस्था पाहून शिष्यांच्या मनात काही विचार आले असावेत. त्यांनी येशूला प्रश्न विचारला, "गुरू, कोणी पाप केलं? ह्यानं, किंवा ह्याच्या आईबापांनी, म्हणून हा अंधळा जन्मला?"

पण ह्या विषयावर चर्चा करण्याची ही वेळ नाही असे येशूला वाटले असावे. त्या अंधळ्या माणसाला दृष्टी देणे त्याने अधिक महत्वाचे मानले. म्हणून शिष्यांना येशूने जे स्पष्टीकरण दिले, "ह्यानं किंवा ह्याच्या आईबापांनी पाप केलं असं नाही, पण देवाची कामं ह्याच्यात प्रगट व्हावीत म्हणून असं झालं. ज्यानं मला धाडलं त्याची कामं आपण दिवस असेपर्यंत केली पाहिजेत. रात्र येते तेव्हा कोणीही काम करू शकत नाही. मी जगात आहे तोवर मी जगाचा प्रकाश आहे."

एवढे बोलल्यावर येशूने जमिनीवर थुंकी टाकली आणि ओली झालेली माती त्याच्या डोळ्यांवर लावली. मग येशूने त्याला शिलोहाच्या तळ्यावर जाऊन आपले डोळे धुवायला सांगितले. त्याने त्याप्रमाणे केले आणि त्याला दिसू लागले. येशू नंतर त्याला भेटला तेव्हा येशूने त्याला विचारले, "तू मनुष्याच्या पुत्रावर विश्वास ठेवतोस का? " पण मनुष्याचा पुत्र स्वतः त्याच्यापुढे उभा आहे ह्याची जाणीव त्याला नव्हती, कारण त्या माणसाने येशूला पूर्वी कधी पाहिले नव्हते. म्हणून त्याने प्रश्न केला, "प्रभू, तो कोण आहे

की, मी त्याच्यावर विश्वास ठेवू?” येशू त्याला म्हणाला, “तू त्याला पहात आहेस आणि तोच तुझ्याशी बोलत आहे.” “प्रभू, मी विश्वास ठेवतो”, असे म्हणून त्याने त्याला नमन केले.

येशूने त्या जन्मांध माणसाला शब्बाथ दिवशी दृष्टी दिल्यामुळे परोशी खूप चिडले होते. येशू त्यांना म्हणाला, “मी ह्या जगात न्यायनिवाड्यासाठी आलो, म्हणजे ज्यांना दिसत नाही त्यांना दिसावं, आणि ज्यांना दिसतं त्यांनी अंधळे व्हावं.”

हे ऐकून ते आणखीच संतप्त झाले आणि म्हणाले, “आम्ही पण अंधळे आहोत काय?”

येशू त्यांना म्हणाला, “तुम्ही जर अंधळे असता तर तुमच्याकडे पाप नसतं, पण आता तुम्ही म्हणता की, ‘आम्हाला दिसतं’, म्हणून तुमचं पाप राहतं.” (योहान ९:१-४१)

•

# ९
# शिष्यांबरोबर संवाद

**येशूचे** बारा शिष्य होते, त्याचे प्रेषितही होते. ते सगळे सामान्य लोकांपैकी होते, कोणी कोळी तर कोणी जकातदार. पण ते सगळे येशूने स्वतः निवडलेले आणि बोलावलेले असे होते. येशूने त्यांना विशेष अधिकार दिले होते आणि तो त्यांना महत्वाच्या कामगिरीवर पाठवत असे. ते आजारी लोकांना बरे करत, अशुद्ध आत्म्यांपासून त्यांना मुक्त करत. ते लोकांना बाप्तिस्मा देत असत. ते घरोघरी जाऊन देवाच्या राज्याची सुवार्ता सांगत. येशूच्या स्वर्गारोहणानंतर त्याच्या ह्या शिष्यांनी त्याचे कार्य पुढे चालवले. त्या बारांपैकी एक, यहुदा इस्कार्योत, ह्याने मात्र येशूचा विश्वासघात केला.

येशू त्याच्या बारा शिष्यांचे विशेष मार्गदर्शन करत असे. त्यासाठी तो कधी कधी त्यांना लोकांपासून दूर एकांती नेत असे. शिष्यसुद्धा त्याला वेगवेगळ्या विषयांवर प्रश्न विचारत असत आणि येशू त्यांना समजावून सांगत असे. पण अनेकदा येशू त्याच्या शिष्यांना स्वतः एखादा प्रश्न विचारायचा आणि मग त्यांच्याबरोबर संवाद सुरू करायचा.

•

येशूच्या बारा शिष्यांव्यतिरिक्त त्याचे दुसरे शिष्यही होते. एकदा त्याने आणखी सत्तर जणांना नेमले आणि तो स्वतः जेथे जाणार होता अशा प्रत्येक गावी त्याने त्यांना दोघादोघांना असे आपल्या पुढे पाठवले.

त्याशिवाय पुष्कळ लोक येशूचे शिष्य बनायचे पण ते नंतर त्याला सोडून जात असत. हे पाहून एकदा येशूने त्याच्या बारा शिष्यांना विचारले. "तुमचीपण जायची इच्छा आहे का?"

त्यावर शिमोन पेत्राने येशूलाच प्रश्न विचारला, "प्रभू, आम्ही कोणाकडे जाणार? तुझ्याजवळ सनातन जीवनाची वचनं आहेत. आम्ही विश्वास ठेवतो आणि जाणतो की, तू देवाचा पवित्र आहेस."

येशूने त्यांना उत्तर दिले, "मी तुम्हा बारा जणांना निवडलं ना? पण तुमच्यात एक जण सैतान आहे." हे त्याने यहुदा इस्कार्योत ह्याच्याविषयी म्हटले होते, ज्याने नंतर येशूला धरून दिले. (लूक १०:१, योहान ६:६६-७१)

•

एकदा योहानाने येशूला सांगितले, "गुरू, आम्ही एका माणसाला तुझ्या नावानं भुतं काढताना बघितलं. आम्ही त्याला मना करायचा प्रयत्न केला कारण तो आपल्यामागं येत नाही."

पण येशू म्हणाला, "त्याला मना करू नका. माझ्या नावानं चमत्कार करणारा कोणी मनुष्य लगेच माझ्याविषयी वाईट बोलणार नाही. कारण जो आपल्या विरुद्ध नाही तो आपल्या बाजूचा आहे. मी तुम्हाला सत्य सांगतो, जो कोणी तुम्हाला, तुम्ही ख्रिस्ताचे आहात म्हणून एक पाण्याचा प्याला प्यायला देईल तो आपलं प्रतिफळ गमावणार नाही."

दुसऱ्या एका प्रसंगी येशू असेही म्हणाला होता, "जो माझ्या बाजूचा नाही तो माझ्या विरुद्ध आहे. जो माझ्याबरोबर गोळा

करीत नाही तो विखरतो.” (मत्तय १२:३०, मार्क ९:३८-४१, लूक ९:४९-५०, ११:२३)

•

एकदा एक जण येशूकडे आला आणि त्याच्यापुढे गुडघे टेकून म्हणाला, “प्रभू, माझ्या मुलावर दया करा, कारण तो फेफरेकरी आहे आणि त्याला भयंकर त्रास होतो. तो पुष्कळदा विस्तवात पडतो आणि पुष्कळदा पाण्यात पडतो. मी आपल्या शिष्यांकडे त्याला आणलं आणि ते त्याला बरा करू शकले नाहीत.”

तेव्हा येशू म्हणाला, “अहो, विश्वासहीन आणि विपरीत पिढी, मी कुठवर तुमच्याबरोबर राहू? कुठवर तुमचं सहन करू? त्याला माझ्याजवळ इकडे आण.” येशूने त्याला दटावले तेव्हा ते भूत त्या मुलामधून निघाले आणि तो बरा झाला.

नंतर येशूला त्याच्या शिष्यांनी एकांती विचारले, “आम्ही ते का काढू शकलो नाही?”

येशूने उत्तर दिले, “तुमच्या अल्पविश्वासामुळं! मी तुम्हाला सत्य सांगतो, तुमच्यात जर मोहरीच्या दाण्याएवढा विश्वास असेल, तर तुम्ही ह्या डोंगराला म्हणाल, ‘इथून पुढच्या जागेवर सरक’ आणि तो सरकेल. तुम्हाला काही अशक्य होणार नाही.” (मत्तय १७:१४-२०, मार्क ९:१७-२९)

•

एकदा शिष्यांनी येशूला विनंती केली, “आमचा विश्वास वाढवा.”

आणि तो म्हणाला, “तुमच्यात मोहरीच्या दाण्याएवढा विश्वास असेल तर तुम्ही ह्या तुतीला म्हणाल, ‘तू समूळ उपटून नीघ आणि समुद्रात टाकली जा ’, आणि ती तुमचं ऐकेल.” (लूक १७:५-६)

●

कपर्णहूम येथील सभास्थानात शिकवत असताना येशू म्हणाला, “मी जीवनाची भाकर आहे. माझ्याकडे जो येतो त्याला कधीही भूक लागणार नाही. तुमच्या पूर्वजांनी रानात मान्ना खाल्ला आणि ते मेले. पण स्वर्गातून उतरलेली भाकर अशी आहे की, कोणीही ती खावी आणि मरू नये. मी स्वर्गातून उतरलेली जिवंत भाकर आहे. ह्या भाकरीतून कोणी खाईल तर तो सर्वकाळ जिवंत राहील. आणि जगाच्या जीवनासाठी मी जी भाकर देईन ती माझा देह आहे.”

हे ऐकून त्याच्या शिष्यांतल्या पुष्कळांनी म्हटले, “हे वचन कठिण आहे. हे कोणाला ऐकवेल?”

पण येशूने अंतरी ओळखले की, आपले शिष्य ह्याविषयी कुरकुर करीत आहेत आणि तो त्यांना म्हणाला, “ह्याचा तुम्हाला अडथळा होतो काय? आणि तुम्ही जर मनुष्याच्या पुत्राला तो आधी होता तिथं वर जाताना पहाल तर? आत्मा जीवन देणारा आहे, देह काही लाभ घडवीत नाही. मी तुमच्याशी बोललो ती वचनं आत्मा आणि जीवन आहेत. पण तुमच्यात असे काही आहेत की, ते विश्वास ठेवीत नाहीत.” (योहान ६:३०-६४)

●

येशूचा जिवलग मित्र लाजर बेथानी गावी आजारी असल्याचा निरोप त्याला मिळाला तेव्हा तो शिष्यांना म्हणाला,

“आपण पुन्हा यहुदियात जाऊ या.” शिष्यांनी त्याला विचारले, “गुरू, यहुदी आपल्याला आताच दगडमार करू पहात होते आणि आपण पुन्हा तिकडे जाऊ पाहता?”

येशूने त्यांना उत्तर दिले, “दिवसाचे बारा तास असतात ना? कोणी दिवसा चालल्यास तो अडखळणार नाही, कारण त्याला ह्या जगाचा प्रकाश दिसतो. पण कोणी रात्री चालल्यास तो अडखळतो, कारण त्याच्यात प्रकाश नाही. आपला मित्र लाजर आजारी आहे, आपण त्याच्याकडे जाऊ या.” (योहान ११:१-१५)

•

एक दिवशी सकाळीच येशू बेथानीहून यरुशलेम नगराकडे जात होता आणि तेव्हा तो भुकेला होता. त्याने वाटेवर एक अंजिराचे झाड बघितले. त्याला त्यावर काही खायला मिळेल ह्या अपेक्षेने तो त्या झाडाजवळ गेला. पण त्याला त्यावर केवळ पानांशिवाय काही आढळले नाही, कारण त्यावेळी अंजिरांचा हंगाम नव्हता. तेव्हा तो त्याला झाडाला म्हणाला, “आतापासून पुढील काळात तुझ्यावर फळ न येवो.” आणि लगेच ते अंजिराचे झाड वाळून गेले. शिष्यांनी हे बघितले तेव्हा त्यांनी आश्चर्य केले आणि ते म्हणाले, “हे अंजिराचं झाड लगेच कसं वाळलं?”

येशू त्यांना म्हणाला, “मी तुम्हाला सत्य सांगतो, तुमच्यात जर विश्वास असेल, आणि तुम्ही संशय धरणार नाही, तर तुम्ही हे अंजिराच्या झाडाला कराल एवढंच नाही, पण तुम्ही जर ह्या डोंगराला म्हणाल, ‘तू इथून काढला जाऊन समुद्रात टाकला जा’, तर तसं होईल. आणि तुम्ही ज्या काही गोष्टी प्रार्थनेत, विश्वास

ठेवून मागाल, त्या सर्व तुम्हाला मिळतील." (मत्तय २१:१८-२२, मार्क ११:१२-१४,२०-२५)

•

येशू एकदा मंदिरातून बाहेर जात असता त्याच्या शिष्यांतला एक जण त्याला म्हणाला, "गुरू, बघा, कसले हे दगड, आणि कसल्या ह्या इमारती?"

आणि येशू त्याला म्हणाला, "तू ह्या मोठ्या इमारती पाहतोस ना? इथं पाडला जाणार नाही असा दगडावर दगड राहू दिला जाणार नाही."

तेव्हा शिष्यांनी येशूला विचारले, "आम्हाला सांगा, ह्या गोष्टी केव्हा होतील? आणि आपल्या येण्याचं आणि युगाच्या समाप्तीचं चिन्ह काय?"

येशू म्हणाला, "तुम्हाला कोणी फसवू नये म्हणून जपा. कारण माझ्या नावानं पुष्कळ जण येतील, आणि म्हणतील, 'मी ख्रिस्त आहे', आणि तुम्हाला फसवतील. आणि तुम्ही लढायांविषयी आणि लढायांच्या अफवा ऐकाल पण तुम्ही घाबरू नका. कारण ह्या गोष्टी झाल्या पाहिजेत. पण अजून शेवट नाही. कारण राष्ट्र राष्ट्रावर उठेल आणि राज्य राज्यावर उठेल. आणि जागजागी दुष्काळ उद्‌भवतील आणि भूकंप होतील. पण ह्या सर्व गोष्टी यातनांचा प्रारंभ होत." (मत्तय २४:१-८, मार्क १३:१-११, लूक २१:५-९)

•

# १०

# अखेरचे संवाद

**येशू** शेवटच्या वेळी यरुशलेमला जात असताना त्याने त्याच्या बारा शिष्यांना एकीकडे घेतले आणि तो त्यांना म्हणाला,

"बघा, आपण यरुशलेमला वर जात आहो, आणि मनुष्याचा पुत्र वरिष्ठ याजकांच्या आणि शास्त्र्यांच्या हाती दिला जाईल. ते त्याला मरणाच्या शिक्षेसाठी दोषी ठरवतील आणि त्याला चिडवायला, फटके मारायला आणि वधस्तंभावर खिळायला परजनांच्या हाती देतील. आणि तिसऱ्या दिवशी तो उठवला जाईल."

खरे तर येशूने त्याच्या मरणाविषयीची आणि पुनरुत्थानाविषयीची पूर्वकल्पना त्याच्या शिष्यांना आधी दिलेली होती आणि तीसुद्धा एकदा नाही तर तीनदा. (मत्तय १६:२१-२३, १७:२१-२३, २०:१७-१९) ती ऐकून त्याचे शिष्य दुःखी होत पण त्यांना फारसे समजत नसे. म्हणून त्या अखेरच्या दिवसांत येशूने त्यांना त्याविषयी निरनिराळ्या प्रकारे सांगितले.

•

येशूने त्याच्या शिष्यांबरोबर रात्रीचे भोजन करायच्या आधी त्याने आपली वस्त्रे एकीकडे ठेवली आणि एक फडका घेऊन आपल्या कमरेला बांधला. त्याने एका भांड्यात पाणी ओतले. मग तो शिष्यांचे पाय धुऊ लागला आणि कमरेला बांधलेल्या फडक्याने पुसू

लागला. पण तो शिमोन पेत्राकडे आला तेव्हा पेत्राने त्याला विचारले, "प्रभू, तू माझे पाय का धुतोस?"

येशूः "मी काय करतो हे तू आता जाणत नाहीस, पण तुला पुढे कळेल."

पेत्रः "तुला माझे पाय कधीच धुवायचे नाहीत."

येशूः "मी जर तुला धुतलं नाही, तर तुला माझ्याबरोबर वाटा नाही."

पेत्रः "प्रभू, माझे पायच नाही, पण हात आणि डोकंपण धू."

तेव्हा येशू म्हणाला, "ज्याचं स्नान झालं आहे त्याला पायांशिवाय काही धुवायची गरज नाही, तर तो सर्वांगी शुद्ध आहे. तुम्ही शुद्ध आहा, पण सगळे नाही." कारण त्याला कोण धरून देईल हे तो जाणत होता.

शिष्यांचे पाय धुतल्यावर येशूने आपली वस्त्रे घेतली, तो पुन्हा खाली बसला आणि त्यांना म्हणाला, "मी तुम्हाला काय केलं ते तुम्हाला समजलं का? तुम्ही मला गुरू आणि प्रभू म्हणता, आणि ठीक म्हणता, कारण मी आहे. मग मी जर तुमचा प्रभू आणि गुरू असता तुमचे पाय धुतले तर तुम्हीपण एकमेकांचे पाय धुवावेत. मी तुम्हाला केलं तसं तुम्हीही करावं म्हणून मी तुम्हाला उदाहरण दिलं आहे." (योहान १३:४-१५)

•

येशू शिष्यांना म्हणाला, "मुलांनो, मी अजून थोडा वेळ तुमच्याबरोबर आहे. तुम्ही मला शोधाल आणि मी जाईन तिकडे तुम्हाला येता येणार नाही. मी एक नवी आज्ञा तुम्हाला देतो, तुम्ही

एकमेकांवर प्रीती करा. मी तुमच्यावर प्रीती केली तशी तुम्हीही एकमेकांवर प्रीती करा. तुमची एकमेकांवर प्रीती असेल तर ह्यावरून सर्व ओळखतील की, तुम्ही माझे शिष्य आहा."

शिमोन पेत्राने त्याला विचारले, "प्रभू, तू कुठं जातोस?"

येशूः "मी जाईन तिकडे आता तुला माझ्यामागं येता येणार नाही, पण नंतर तू माझ्यामागं येशील."

पेत्रः "प्रभू, मला तुझ्यामागं का येता येणार नाही? मी तुझ्याकरता माझा जीव देईन."

येशूः "तू माझ्याकरता तुझा जीव देशील काय? मी तुला सत्य सत्य सांगतो, तू मला तीनदा नाकारशील तोपर्यंत कोंबडा आरवणार नाही." (योहान १३:३३-३८)

•

येशूने त्याच्या शिष्यांना सांगितले, "तुमचं मन अस्वस्थ होऊ देऊ नका. देवावर विश्वास ठेवा, माझ्यावर विश्वास ठेवा. माझ्या पित्याच्या घरात पुष्कळ वसतीच्या जागा आहेत. नसत्या तर, मी तुम्हाला सांगितलं असतं, कारण मी तुमच्यासाठी जागा तयार करायला जातो. आणि मी जर गेलो आणि मी तुमच्यासाठी जागा तयार केली तर मी पुन्हा येईन आणि तुम्हाला माझ्याजवळ घेईन. म्हणजे जिथं मी आहे तिथं तुम्ही पण असावं. आणि मी कुठं जातो तो मार्ग तुम्हाला माहीत आहे."

त्यावर थोमा त्याला म्हणाला, "प्रभू, आपण कुठं जाता ते आम्हाला माहीत नाही; मग मार्ग कसा माहीत आहे?"

येशूने त्याला सांगितले, “मार्ग, सत्य आणि जीवन मी आहे. माझ्याद्वारे आल्याशिवाय कोणी पित्याकडे येत नाही. तुम्ही मला ओळखलं असतं तर माझ्या पित्यालाही ओळखलं असतं. तुम्ही त्याला आता ओळखता आणि तुम्ही त्याला पाहिलं आहे.”

तेव्हा फिलिप त्याला म्हणाला, “प्रभू, आम्हाला पिता दाखवा, आणि आम्हाला तेवढं पुरे आहे.”

येशूने त्याला विचारले, “मी इतका दीर्घकाळ तुमच्याबरोबर आहे आणि, फिलिपा, तू मला ओळखीत नाहीस? ज्यानं मला पाहिलं आहे त्यानं पित्याला पाहिलं आहे.” (योहान १४:१-९)

•

येशूचा शिष्य यहुदा इस्कार्योत ह्याने विचारले, “प्रभू, असं काय झालं की, आपण आम्हाला प्रगट व्हाल आणि जगाला नाही?”

येशूने उत्तर दिले, “कोणीही माझ्यावर प्रीती करील तर तो माझं वचन पाळील, आणि त्याच्यावर माझा पिता प्रीती करील, आणि आम्ही त्याच्याकडे येऊ, आणि त्याच्याकडे आमचं वसतीचं ठिकाण करू. जो माझ्यावर प्रीती करीत नाही तो माझी वचनं पाळीत नाही. आणि तुम्ही जे वचन ऐकता ते माझं नाही पण ज्यानं मला धाडलं त्या पित्याचं आहे. मी तुमच्याबरोबर रहात असताना मी ह्या गोष्टी तुम्हाला सांगितल्यात. पण पिता ज्याला माझ्या नावानं धाडील तो कैवारी म्हणजे पवित्र आत्मा तुम्हाला सर्व गोष्टी शिकवील, आणि मी ज्या गोष्टी तुम्हाला सांगितल्यात त्या सर्व गोष्टींची तुम्हाला आठवण देईल.” (योहान १४:२२-२६)

•

येशू बेथानीत कुष्ठरोगी शिमोन ह्याच्या घरात असता तेथे एक स्त्री आली. ती एक अतिमोलवान सुवासिक तेलाची कुपी घेऊन आली होती. येशू भोजनास बसल्यावर तिने ती फोडली आणि तिने त्याच्या मस्तकावर तेल ओतले. पण त्याच्या शिष्यांनी ते बघितले तेव्हा त्यांना राग आला आणि त्यांनी कुरकुर केली, "ह्या सुवासिक तेलाचा असा नाश कशाला? हे पुष्कळ किंमतीला विकता आलं असतं, आणि ते पैसे गरिबांना देता आले असते."

येशूला हे कळले तेव्हा तो त्यांना म्हणाला, "तिला राहू द्या. तुम्ही तिला का त्रास देता? तिनं माझ्यावर एक उचित क्रिया केली आहे. गरीब तुमच्याबरोबर नेहमी आहेत, आणि तुम्हाला वाटेल तेव्हा त्यांना साह्य करता येईल. पण मी तुमच्याबरोबर नेहमी नसणार. तिनं माझं शरीर थडग्यात ठेवता यावं म्हणून त्याला सुवासिक तेल लावलं. मी तुम्हाला सत्य सांगतो, साऱ्या जगात, जिथं कुठं, ही सुवार्ता गाजवली जाईल, तिथं हेही, जे तिनं केलं आहे ते तिच्या स्मरणार्थ सांगितलं जाईल." (मत्तय २६:६-१३, मार्क १४:३-९)

•

येशूच्या शिष्यांनी त्याला विचारले, "आपण वल्हांडणाचं भोजन करावं म्हणून आम्ही जाऊन कुठं तयारी करावी अशी आपली इच्छा आहे?"

येशूने त्याच्या दोन शिष्यांवर हे काम सोपवले आणि त्यांना सांगितले, "नगरात जा, तिथं तुम्हाला एक पाण्याचा घडा घेतलेला मनुष्य भेटेल. त्याच्या मागोमाग जा. आणि जिथं तो आत जाईल तिथल्या घरधन्याला म्हणा, 'गुरू विचारतात की, मला माझ्या

शिष्यांबरोबर वल्हांडणाचं भोजन करायला माझी उतरायची खोली कुठं आहे?' तो स्वतः तुम्हाला एक मोठी, सजवून तयार केलेली, माडीवरची खोली दाखवील. तिथं आपल्यासाठी तयारी करा." मग त्याचे शिष्य बाहेर गेले आणि नगरात आले. त्याने सांगितले होते तसे त्यांना आढळले, आणि त्यांनी वल्हांडणाची तयारी केली. (मत्तय २६:१७-१९, मार्क १४:१२-१६)

•

संध्याकाळ झाली तेव्हा येशू त्याच्या बारा शिष्यांबरोबर वल्हांडणाच्या भोजनास बसला आणि ते जेवत असता तो त्यांना म्हणाला, "मी तुम्हाला सत्य सांगतो, तुमच्यातला एक जण मला धरून देईल."

तेव्हा ते फार दुःखित झाले आणि त्यांच्यातला प्रत्येक त्याला विचारू लागला, "प्रभू, तो मी तर नाही?" मग, ज्याने येशूला धरून दिले त्या यहुदाने स्वतः विचारले, "रब्बी, तो मी तर नाही?" येशूने उत्तर दिले, "तू म्हणालास."

मग येशूने शिष्यांना म्हटले, "ज्यानं माझ्याबरोबर थाळीत हात भिजवला तोच मला धरून देईल. मनुष्याचा पुत्र तर, त्याच्याविषयी लिहिल्याप्रमाणं जात आहे, पण ज्या मनुष्याकडून मनुष्याचा पुत्र धरून दिला जाईल त्याला हळहळ! तो मनुष्य जन्मला नसता तर त्याच्यासाठी ते बरं झालं असतं."

येशूने घास भिजवून तो शिमोनाचा पुत्र यहुदा इस्कार्योत ह्याला दिला. आणि लगेच सैतान त्याच्यात शिरला. येशू त्याला म्हणाला, "तू जे करणार ते लवकर कर."

आणि ते जेवत असता येशूने भाकर घेतली आणि आशीर्वाद मागून मोडली, आणि शिष्यांना देऊन म्हटले, “घ्या, खा, हे माझं शरीर आहे.” आणि त्याने प्याला घेतला आणि उपकार मानले, आणि तो त्यांना दिला आणि म्हटले, “तुम्ही सगळे जण ह्यातून प्या. कारण हे माझं कराराचं रक्त आहे. हे पापांच्या क्षमेसाठी पुष्कळांसाठी ओतलेलं आहे.” (मत्तय २६:२०-३०, मार्क १४:१७-२६, योहान १३:२१-३०)

•

# ११

# येशूची चौकशी

**यहुदा** इस्कार्योतने येशूचा विश्वासघात करून त्याला धरून दिल्यानंतर येशूला अटक केली गेली. त्यानंतर त्याला वेगवेगळ्या अधिकाऱ्यांपुढे आणि न्यायासनांपुढे उभे करण्यात आले. त्याला एखाद्या गुन्हेगारासारखे निर्दयपणे वागवण्यात आले. त्याला फटके मारले गेले. त्याची थट्टा केली गेली. त्याची चौकशी होत असताना त्याला तेच प्रश्न पुन्हा पुन्हा विचारले गेले. त्याच्यावर खोटे आरोप ठेवण्यात आले. लोकांनी त्याच्याविरुद्ध खोटी साक्ष दिली. पण येशूने हे सगळे सहन केले. त्याला विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे त्याने मोजक्या शब्दांत दिली किंवा तो शांत राहिला.

त्याच्याविषयी शास्त्रलेखात जे लिहिले होते तसेच घडले. ते असे की, 'मेंढराप्रमाणे त्याला वधासाठी नेण्यात आले, आणि कोकरू जसे कातरणाऱ्यापुढे मुके असते तसे त्याने आपले तोंड उघडले नाही. त्याचा न्याय त्याच्या दीन अवस्थेत हिरावला गेला. आणि कोण त्याच्या पिढीचे वर्णन करील? कारण पृथ्वीवरून त्याचा जीव घेतला गेला आहे.' (यशया ५३:७-८, प्रे.कृ. ८:३२-३३)

•

येशूला अटक केल्यानंतर दिवस उजाडताच लोकांचे वडील, वरिष्ठ याजक आणि शास्त्री एकत्र आले आणि त्यांनी त्याला आपल्या न्यायसभेत नेऊन म्हटले, "तू ख्रिस्त असलास तर आम्हाला सांग."

येशू त्यांना म्हणाला, "मी तुम्हाला सांगितलं तर तुम्ही विश्वास ठेवणार नाही आणि मी विचारलं तर तुम्ही उत्तर देणार नाही. पण ह्यापुढं मनुष्याचा पुत्र देवाच्या सामर्थ्याच्या उजवीकडे बसेल."

येशूची चौकशी होत असताना श्रेष्ठ याजकाने पुन्हा त्याला तेच विचारले, "मी तुला जिवंत देवाची शपथ घालतो, तू आम्हाला सांग. तू काय ख्रिस्त, देवाचा पुत्र आहेस?"

येशूचे उत्तर होते, "तुम्ही म्हणालात! तरी मी तुम्हाला सांगतो, तुम्ही ह्यापुढं पहाल की, मनुष्याचा पुत्र सामर्थ्याच्या उजवीकडे बसला आहे आणि आकाशातल्या ढगांवर येत आहे." (मत्तय २६:६३-६४, मार्क १४:६१-६२, लूक २२:६६-७०)

•

येशूला जेव्हा मरणाच्या शिक्षेस पात्र ठरवले गेले तेव्हा लोक त्याच्या तोंडावर थुंकले, त्यांनी त्याला बुक्क्या मारल्या, आणि दुसऱ्यांनी त्याला चपडाका मारल्या. त्यांनी त्याचे तोंड झाकले आणि त्याला विचारले,

"अरे ख्रिस्ता, आमच्यासाठी भाकीत कर, तुला मारणारा कोण आहे?" पण येशू काही बोलला नाही. (मत्तय २६:६५-६८, मार्क १४:६३-६५)

•

श्रेष्ठ याजकाने येशूला त्याच्या शिष्यांविषयी आणि त्याच्या शिक्षणाविषयी प्रश्न केले. येशूने त्याला सांगितले, "मी जगाशी उघडपणे बोललो. मी नेहमी सभास्थानात आणि मंदिरात, जिथं

यहुदी नेहमी असतात, तिथं शिकवलं. आपण मला कशाला विचारता? जे माझं ऐकत असत त्यांना विचारा."

तेथे जवळ उभ्या असलेल्या एका कामदाराने येशूला थप्पड मारली आणि म्हटले, "तू श्रेष्ठ याजकांना असं उत्तर देतोस काय?"

येशू म्हणाला, "मी वाईट बोललो असलो तर वाइटाविषयी साक्ष दे. पण बरोबर बोललो असलो तर तू मला का मारतोस?" (योहान १८:१९-२३)

•

वरिष्ठ याजक आणि वडील येशूवर एकामागून एक आरोप करत होते, पण तो काहीच बोलत नव्हता. तेव्हा पिलाताने त्याला विचारले, "तुला ऐकू येत नाही? हे किती गोष्टींची तुझ्याविरुद्ध साक्ष देत आहेत?" तरीसुद्धा येशूने त्यांच्या एकाही आरोपाला उत्तर दिले नाही. त्याचे पिलाताला फार आश्चर्य वाटले.

येशूच्या चोकशीच्या वेळी पंतय पिलाताने त्याला विचारले, "तू यहुद्यांचा राजा आहेस काय?"

येशूने उत्तर दिले, "माझं राज्य ह्या जगातलं नाही. माझं राज्य ह्या जगातलं असतं तर यहुद्यांच्या हाती मी दिला जाऊ नये म्हणून माझे कामदार लढले असते. पण माझं राज्य आता इथलं नाही."

तेव्हा पिलात त्याला म्हणाला, "तर तू राजा आहेस काय?"

येशूने उत्तर दिले, "मी राजा आहे असं आपण म्हणता. मी सत्याची साक्ष द्यावी ह्याकरता मी जन्मास आलो, आणि ह्याकरता

मी जगात आलो. जो कोणी सत्याचा आहे तो माझा आवाज ऐकतो.”

त्यावर पिलाताने त्याला प्रश्न विचारला, “सत्य काय आहे?”

येशूने पिलाताच्या ह्या प्रश्नाचे उत्तर दिले नाही. खरे तर, पिलातासमोर साक्षात सत्य उभे होते. पण त्याला ते दिसले नव्हते.

पिलात बाहेर गेला आणि लोकांना म्हणाला, “बघा, मला त्याच्यात काही अपराध आढळत नाही.” पण लोकांच्या दडपणामुळे पिलात पुन्हा वाड्यात गेला आणि येशूला म्हणाला, “तू कुठला आहेस?” येशूने त्याला उत्तर दिले नाही तेव्हा पिलाताने त्याला विचारले, “तू माझ्याशी बोलत नाहीस? मला तुला सोडून द्यायचा अधिकार आहे, आणि वधस्तंभावर खिळायचा अधिकार आहे, हे तुला माहीत नाही काय?”

येशूने उत्तर दिले, “आपल्याला तो वरून दिलेला नसता तर आपल्याला माझ्यावर अधिकार नसता, म्हणून ज्यानं मला आपल्या हाती दिलं त्याचं पाप मोठं आहे.” (मत्तय २७:१२-१४, मार्क १५:३-५, योहान १८:३३-३८, १९:१-११)

•

# १२

# वधस्तंभांवरचा संवाद

**येशूला** मरणाची शिक्षा दिल्या गेल्यानंतर गुलगुथा म्हणजे कवटीचे ठिकाण म्हटलेल्या जागी वधस्तंभावर खिळण्यात आले. येशूच्या वधस्तंभाच्या दोन बाजूंना आणखी दोन वधस्तंभ होते ज्यांच्यावर मरणाची शिक्षा दिलेल्या दोन अन्य गुन्हेगारांना खिळले गेले होते. त्यांच्यांतील अंतर फार नसावे कारण हे तिघे जण एकमेकांशी बोलू शकत होते.

त्या ठिकाणी उभे असलेले आणि जवळून जाणारे लोक येशूची चेष्टा करीत होते, "अहा! तू मंदिर मोडणाऱ्या आणि तीन दिवसांत उभारणाऱ्या! स्वतःला वाचव, वधस्तंभावरून खाली ये." अधिकारी त्याचा उपहास करून म्हणत होते, "ह्यानं दुसऱ्यांना वाचवलं, हा जर ख्रिस्त असेल तर ह्यानं स्वतःला वाचवावं." शिपाईदेखील त्याला चिडवीत त्याच्याकडे आले आणि म्हणाले, "आपण यहुद्यांचे राजे आहात तर स्वतःला वाचवा."

पण वधस्तंभावर टांगलेल्या अवस्थेत यातना भोगत असताना येशूने प्रार्थना केली, "बापा, त्यांना क्षमा कर, कारण ते काय करतात हे ते जाणत नाहीत."

येशूच्या शेजारी टांगलेल्या एका गुन्हेगारानेदेखील त्याची निंदा करून म्हटले, "तू ख्रिस्त आहेस ना? मग स्वतःला वाचव आणि आम्हालाही वाचव."

पण येशूच्या दुसऱ्या बाजूच्या गुन्हेगाराने त्याला म्हटले, “तू त्याच शिक्षेखाली आहेस, आणि देवाला भीत नाहीस काय? आपण खरोखर न्यायानं आहोत, कारण आपण जे करीत होतो त्याचा मोबदला घेत आहोत, पण ह्यानं काही विपरीत केलं नाही.”

मग तो येशूला म्हणाला, “येशू, तू आपल्या राज्यात येशील तेव्हा माझी आठवण कर.”

येशूने त्याला उत्तर दिले, “मी तुला सत्य सांगतो, आज तू माझ्याबरोबर सुखलोकात असशील.” (मत्तय २७:३२-४४, मार्क १५:२०-३२, लूक २३:२६-४३)

•

# १३
# पुनरुत्थानानंतरचे संवाद

**येशूच्या** मृत्यूनंतर संध्याकाळ झाली तेव्हा योसेफ नावाचा एक धनवान मनुष्य पिलाताकडे गेला. तो येशूचा एक शिष्य होता आणि अरिमथाईचा रहिवासी होता. पिलाताकडून त्याने येशूचे शरीर मागितले, ते घेऊन स्वच्छ तागाच्या वस्त्रात गुंडाळले, एका खडकात खोदलेल्या आपल्या नव्या थडग्यात ठेवले, थडग्याच्या दारावर एक मोठी शिळा लोटली, आणि तो निघून गेला. त्या थडग्याच्या समोर दोन स्त्रिया मात्र काही वेळ बसून राहिल्या, एक मग्दाली मरिया आणि मरिया नावाची दुसरी एक स्त्री. पिलाताने ते थडगे सुरक्षित करण्याची आज्ञा दिली. शिळेवर शिक्का मारला गेला आणि तेथे पहारा ठेवण्यात आला. (मत्तय २७:५७-६६)

पण तिसऱ्या दिवशी येशू जिवंत असल्याचे मग्दाली मरिया आणि इतर स्त्रियांना प्रथम कळले. भल्या पहाटेस मग्दाली मरिया त्याच्या थडग्याकडे गेली असताना तिला थडग्यावरून शिळा काढलेली दिसली. तिने धावत जाऊन शिमोन पेत्राला आणि योहानाला सांगितले, "त्यांनी प्रभूला थडग्यातून काढून नेलं आणि त्याला कुठं ठेवलं हे आम्हाला माहीत नाही."

शिष्य तेथे आले आणि ते पाहून पुन्हा आपल्या घरी परतले. पण मरिया मात्र थडग्याजवळ बाहेर रडत उभी राहिली. ती रडत असता थडग्यात ओणवली आणि येशूचे शरीर आधी ठेवलेले होते

तेथे तिने दोन देवदूत पाहिले. ते शुभ्र वस्त्रे परिधान करून बसले होते. त्यांनी तिला विचारले, “बाई, तू का रडतेस?”

ती त्यांना म्हणाली, “कारण त्यांनी माझ्या प्रभूला काढून नेलं, आणि त्याला कुठं ठेवलं ते मला माहीत नाही.”

एवढे बोलल्यावर ती मागे वळली, आणि तिने उभ्या असलेल्या येशूला पाहिले. पण तो येशू आहे हे तिला समजले नाही. येशूने तिला विचारले, “बाई, तू का रडतेस? तू कुणाला शोधतेस?”

तो माळी आहे असे समजून ती त्याला म्हणाली, “महाराज, तुम्ही त्याला इथून नेलं असेल तर कुठं ठेवलंत ते मला सांगा म्हणजे मी त्याला घेऊन जाईन.”

तेव्हा येशू तिला म्हणाला, “मरिये! ” आणि ती म्हणाली, “रब्बोनी!” (म्हणजे गुरू)

येशूने तिला सांगितले, “मला धरू नकोस, कारण मी अजून पित्याकडे वर गेलो नाही. पण माझ्या बांधवांकडे जा, आणि त्यांना सांग, ‘जो माझा पिता आणि तुमचा पिता, माझा देव आणि तुमचा देव आहे, त्याच्याकडे मी वर जातो.’ ”

मग्दाली मरिया शिष्यांकडे गेली आणि तिने प्रभूला पाहिले आणि तो तिच्याशी बोलला असे तिने त्यांना सांगितले. (योहान २०:१-१८)

•

येशूच्या पुनरुत्थानानंतर चाळीस दिवसांनी त्याचे स्वर्गारोहण झाले. ह्या दरम्यानच्या काळात अनेकदा त्याने त्याच्या शिष्यांना आपण जिवंत असल्याचे प्रमाण दाखवले. येशूने शिष्यांना

नुसतेच दर्शन दिले असे नाही, तर तो त्यांच्याबरोबर बसला, चालला आणि जेवलासुद्धा. तो त्यांच्याशी बोलला आणि त्याने त्यांना देवाच्या राज्याविषयी सांगितले. (प्रे.कृ. १:१-३)

•

येशूचे पुनरुत्थान झाले त्याच दिवशी, येशूचे दोन शिष्य यरुशलेमाहून अम्माऊस नावाच्या खेड्याकडे जात होते. चालता चालता ते नुकत्याच घडलेल्या गोष्टींविषयी एकमेकांशी बोलत होते. नकळत येशू त्यांच्या जवळ आला आणि त्यांच्याबरोबर जाऊ लागला, पण त्यांनी त्याला ओळखले नाही. तो त्यांना म्हणाला, "तुम्ही चालताना एकमेकांशी बोलत आहा त्या काय गोष्टी आहेत?"

हे ऐकून त्यांना आश्चर्य वाटले आणि क्लयपा नाव असलेल्या त्यांच्यातल्या एकाने येशूला विचारले, "तुम्ही यरुशलेमात एकटे प्रवासी म्हणून राहता काय? आणि ह्या दिवसांत इथं घडलेल्या गोष्टी तुम्हाला कळल्या नाहीत?"

पण येशूने त्यांनाच परत प्रश्न केला, "कोणत्या गोष्टी?"

आणि ते त्याला म्हणाले, "नासरेथकर येशूविषयी! तो देवापुढं आणि सर्व लोकांपुढं, कृतीनं आणि उक्तीनं, एक पराक्रमी संदेष्टा झाला. वरिष्ठ याजकांनी आणि आमच्या अधिकाऱ्यांनी त्याला मरणाच्या शिक्षेसाठी धरून दिलं आणि वधस्तंभावर खिळलं. पण आम्ही आशा केली होती की, इस्त्राएलाची सुटका करील असा हा होता. आणि तरी, ह्या सर्व गोष्टींशिवाय, ह्या गोष्टी झाल्यास आज तिसरा दिवस आहे. शिवाय आमच्यातल्या कित्येक स्त्रियांनी आम्हाला चकित केलं. त्या पहाटेस थडग्याकडे आल्या होत्या. आणि त्यांना त्याचं शरीर सापडलं नाही, तेव्हा त्या आल्या आणि त्यांनी

सांगितलं की, त्यांना देवदूतांचं दर्शन घडलं आणि ते त्यांना म्हणाले की, तो जिवंत आहे. तेव्हा जे लोक आमच्याबरोबर होते त्यांच्यातले कित्येक जण थडग्याकडे गेले आणि त्यांना त्या स्त्रियांनी सांगितल्याप्रमाणं आढळलं, पण त्यांनी त्याला बघितलं नाही."

तेव्हा येशू त्या दोघांना म्हणाला, "अहो अज्ञानी! आणि संदेष्ट्यांनी सांगितलेल्या सर्व गोष्टींवर विश्वास ठेवायला मनाचे मंद असलेले तुम्ही! ख्रिस्तानं ह्या गोष्टी सोसाव्यात आणि आपल्या गौरवात जावं ह्याचं अगत्य नव्हतं काय?"

मग त्याने मोशे आणि सर्व संदेष्टे ह्यांच्यापासून सुरुवात करून त्यांना सर्व शास्त्रलेखांतील स्वतःविषयी असलेल्या गोष्टी विशद केल्या. नंतर ते जिकडे जात होते त्या खेड्याजवळ आले तेव्हा तो पुढे जाणार असावा असे त्यांना वाटले. ते त्याला थांबवून म्हणाले, "आमच्याबरोबर रहा, कारण संध्याकाळ होत आहे आणि दिवस पार सरला आहे." तो त्यांच्याबरोबर रहायला आत गेला. आणि असे झाले की, तो त्यांच्याबरोबर भोजनास बसला असता, त्याने भाकर घेतली आणि आशीर्वाद मागून मोडली आणि त्यांना दिली. तेव्हा त्यांचे डोळे उघडले आणि त्यांनी त्याला ओळखले, पण तो त्यांच्या दृष्टीपुढून नाहीसा झाला. तेव्हा ते आपआपल्यात म्हणाले, "तो वाटेत आपल्याशी बोलत असता, आणि आपल्याला शास्त्रलेखांचा उलगडा करीत असता आपल्यात आपलं अंतःकरण पेटलं नव्हतं काय?" (लूक २४:१२-३२)

•

येशूच्या मरणानंतर त्याचे शिष्य यहुद्यांच्या भीतीमुळे, दारे बंद ठेवून घरात एकत्र जमले होते. पण येशू त्या खोलीत आत आला आणि मध्यभागी उभा राहून त्यांना म्हणाला, "तुम्हाला शांती असो."

त्याने त्यांना आपले हात दाखवले आणि कूस दाखवली आणि शिष्यांनी प्रभूला बघितले तेव्हा ते आनंदित झाले. तेव्हा येशू त्यांना पुन्हा म्हणाला, "तुम्हाला शांती असो. जसं पित्यानं मला पाठवलं तसंच मी तुम्हाला धाडतो."

एवढे बोलल्यावर त्याने त्यांच्यावर फुंकर टाकली आणि तो त्यांना म्हणाला, "पवित्र आत्म्याचा स्वीकार करा. तुम्ही ज्यांची पापं सोडाल त्यांना ती सोडलेली आहेत आणि ज्यांची ठेवाल ती ठेवलेली आहेत."

पण येशू आला असताना त्याचा शिष्य थोमा तेथे नव्हता. दुसऱ्या शिष्यांनी त्याला नंतर सांगितले, "आम्ही प्रभूला पाहिलं."

तेव्हा थोमा त्यांना म्हणाला, "मी त्याच्या हातांत खिळ्यांची खूण बघितल्याशिवाय, खिळ्यांच्या जागी माझं बोट घातल्याशिवाय, आणि त्याच्या कुशीत माझा हात घातल्याशिवाय मी विश्वास ठेवणार नाही."

आठ दिवसांनंतर येशूचे शिष्य पुन्हा घरात एकत्र जमले होते ह्या वेळी मात्र थोमाही तेथे उपस्थित होता. पुन्हा एकदा, दारे बंद असताना येशू तेथे आत आला आणि त्यांच्या मध्यभागी उभा राहून म्हणाला, "तुम्हाला शांती असो."

मग तो थोमाला म्हणाला, “तुझं बोट पुढं कर, आणि माझे हात बघ. तुझा हात पुढं कर आणि माझ्या कुशीत घाल. आणि विश्वासहीन होऊ नकोस पण विश्वास ठेवणारा हो.”

आणि थोमाने एवढेच शब्द उच्चारले, “माझा प्रभू आणि माझा देव!”

तेव्हा येशू त्याला म्हणाला, “तू मला पाहिलंस म्हणून विश्वास ठेवलास. ज्यांनी बघितलं नाही आणि विश्वास ठेवला आहे ते धन्य!” (योहान २०:१९-२९)

•

पुनरुत्थित येशूने त्याच्या शिष्यांना शेवटचे दर्शन दिले ते तिबिर्याच्या समुद्राजवळ. शिमोन पेत्र, थोमा आणि येशूचे आणखी काही शिष्य तेथे रात्री मासे धरायचा प्रयत्न करत होते पण त्यांना काही मिळाले नव्हते. सकाळ होतेवेळी येशू किनाऱ्याजवळ उभा होता, पण शिष्यांनी त्याला ओळखले नाही. येशूने त्यांना विचारले, “मुलांनो, तुमच्याजवळ काही खायला आहे काय?”

ते त्याला म्हणाले, “नाही.”

येशू त्यांना म्हणाला, “मचव्याच्या उजवीकडे जाळं टाका आणि तुम्हाला मिळेल.”

त्यांनी तसे केले पण माशांच्या घोळक्यामुळे त्यांना जाळे ओढवेना, तेव्हा त्यांना समजले की, तो येशू आहे. येशूने त्यांना भाकर आणि मासळी खायला दिली.

ते जेवल्यावर येशूने शिमोन पेत्राला विचारले, “योहानाच्या पुत्रा, शिमोना, तू माझ्यावर ह्यांपेक्षा अधिक प्रीती करतोस काय?”

पेत्र म्हणाला, “हो, प्रभू, तू जाणतोस की, मी तुझ्यावर प्रीती करतो.”

येशू त्याला म्हणाला, “माझी कोकरं चार.”

पण येशूने दुसऱ्यांदा विचारले, “योहानाच्या पुत्रा, शिमोना, तू माझ्यावर प्रीती करतोस काय?”

तो म्हणाला, “हो, प्रभू, तू जाणतोस की, मी तुझ्यावर प्रीती करतो.”

येशू त्याला म्हणाला, “माझी मेंढरं राख.”

मग येशूने पुन्हा विचारले, “योहानाच्या पुत्रा, शिमोना, तू माझ्यावर प्रीती करतोस काय?”

तेव्हा पेत्र दुःखी होऊ लागला, कारण तिसऱ्यांदा येशूने त्याला विचारले होते की, ‘तू माझ्यावर प्रीती करतोस काय?’ तो म्हणाला, “प्रभू, तुला सर्व माहीत आहे, तू जाणतोस की, मी तुझ्यावर प्रीती करतो.”

तेव्हा येशू त्याला म्हणाला, “माझी मेंढरं चार.”

येशू पुढे म्हणाला, “मी तुला सत्य सत्य सांगतो, तू जेव्हा तरुण होतास तेव्हा आपली कंबर बांधून तुझी इच्छा असेल तिकडे जात होतास. पण तू जर्जर होशील तेव्हा आपले हात पुढं करशील, दुसरा तुझी कंबर बांधील आणि तुझी इच्छा नसेल तिकडे तुला नेईल.”

आणि हे बोलल्यावर येशू पेत्राला म्हणाला, “माझ्यामागं ये.” (योहान २१:१-१९)

पुनरुत्थित येशू आणि शिमोन पेत्र ह्यांच्यांतल्या त्या संवादानंतर पेत्राने मागे वळून पाहिले की, येशू ज्याच्यावर प्रीती करीत असे तो शिष्य म्हणजे योहान त्यांच्या मागोमाग येत आहे. पेत्राने येशूला योहानाविषयी विचारले, "प्रभू, ह्याचं काय?"

पण येशूने पेत्राला उलट विचारले, "मी येईपर्यंत त्यानं रहावं अशी जर माझी इच्छा असेल तर त्याचं तुला काय?" आणि त्याने पेत्राला म्हटले, "तू माझ्यामागं ये." (योहान २१:१९-२३)

•

आजच्या काळातसुद्धा येशू लोकांबरोबर चालतो, बोलतो, जेवतो, हा त्याच्या भक्तांचा अनुभव आहे. ज्या लोकांनी त्याला बघितलेले नाही, पण त्याच्यावर विश्वास ठेवला आहे, ते धन्य!

•

# १४

# स्वर्गारोहणापूर्वीचे संवाद

**येशूच्या** पुनरुत्थानानंतर चाळीस दिवसांनी त्याचे स्वर्गारोहण झाले. त्या वेळी त्याने त्याच्या शिष्यांना शेवटचा निरोप कसा दिला ह्याचे वर्णन नव्या कराराच्या वेगवेगळ्या लेखकांनी केलेले आहे.

•

येशूने त्याच्या अकरा शिष्यांना गालिलातील एका डोंगरावर यायला सांगितले होते त्याप्रमाणे ते तेथे गेले. त्यांनी त्याला बघितले तेव्हा ते त्याच्या पाया पडले. तेव्हा येशू त्यांच्या जवळ आला आणि त्यांच्याशी बोलला,

“स्वर्गात आणि पृथ्वीवर सर्व अधिकार मला दिला आहे. म्हणून तुम्ही जा, आणि सर्व राष्ट्रांना शिकवा, आणि त्यांना पित्याच्या, पुत्राच्या आणि पवित्र आत्म्याच्या नावानं बाप्तिस्मा द्या. आणि मी ज्या गोष्टी तुम्हाला नेमून दिल्यात त्या सर्व त्यांना पाळायला शिकवा. आणि पहा, मी तुमच्याबरोबर, सर्व दिवस, युगाच्या समाप्तीपर्यंत आहे.” (मत्तय २८:१६-२०)

•

येशू त्याच्या शिष्यांना म्हणाला,

“तुम्ही सर्व जगात जा आणि सर्व सृष्टीला सुवार्ता सांगा. जो विश्वास ठेवतो आणि बाप्तिस्मा घेतो तो तारला जाईल. पण जो विश्वास ठेवणार नाही तो दोषी ठरेल. आणि विश्वास

ठेवणाऱ्यांबरोबर ही चिन्हं मागोमाग जातील. ते माझ्या नावानं भुतं काढतील, ते नव्या भाषांत बोलतील. ते साप उचलतील आणि ते जर काही प्राणनाशक प्याले तर ते त्यांना बाधणार नाही. ते आजाऱ्यांवर हात ठेवतील आणि ते बरे होतील."

प्रभू येशू त्याच्या शिष्यांबरोबर अशा प्रकारे बोलल्यानंतर वर आकाशात घेतला गेला आणि देवाच्या उजवीकडे बसला. (मार्क १६:१५-१९)

•

येशूने शिष्यांना आज्ञा दिली, "यरुशलेम सोडून जाऊ नका, पण तुम्ही माझ्याकडून ज्याविषयी ऐकलं आहे त्या पित्याच्या वचनाची वाट पहात रहा. कारण योहान, खरोखर, पाण्यानं बाप्तिस्मा करी, पण फार दिवस जाण्याअगोदर तुमचा बाप्तिस्मा पवित्र आत्म्यानं केला जाईल."

त्यावर शिष्यांनी त्याला विचारले, "प्रभू, ह्या काळात, तू इस्त्राएलाचं राज्य पुन्हा प्रस्थापित करणार काय?"

तो त्यांना म्हणाला, "पित्यानं जे काळ आणि समय आपल्या स्वतःच्या सत्तेत ठेवलेत ते कळणं तुमच्यासाठी नाही. पण पवित्र आत्मा तुमच्यावर येईल तेव्हा तुम्हाला सामर्थ्य मिळेल. आणि यरुशलेमात, सर्व यहुदियात, शोमरोनात आणि पृथ्वीच्या शेवटच्या भागापर्यंत तुम्ही माझे साक्षी व्हाल."

त्याने ह्या गोष्टी सांगितल्यावर, ते पहात असता, तो वर घेतला गेला व एका ढगाने त्याला त्यांच्या दृष्टीआड केले. आणि त्यांनी, तो जात असता, आकाशाकडे टक लावली. तेव्हा शुभ्र वस्त्रे

परिधान केलेले दोन पुरुष त्यांच्याजवळ उभे असलेले त्यांनी पाहिले आणि ते म्हणाले,

"अहो गालीलकरांनो, तुम्ही असे आकाशाकडे टक लावून उभे का राहिला? हा जो येशू तुमच्यामधून वर आकाशात घेतला गेला, तो जसा आकाशात गेला हे तुम्ही पाहिलंत तसाच तो येईल." (प्रे.कृ. १:४-११)

•

प्रभू येशू लवकर परत येणार आहे हा आपला विश्वास आहे, कारण त्याने स्वतःच तसे सांगितले आहे. "आमेन, प्रभू येशू, ये." ह्या प्रार्थनेत पवित्र शास्त्राची समाप्ती होते. (प्रकटी. २२:७,१२,२०)

•

# १५
# शेवटचा संवाद

**आद्य** ख्रिस्ती लोकांचा छळ करणारे, त्यांच्या विचारसरणीला विरोध करणारे, त्यांचा द्वेष करणारे पुष्कळ होते. त्यांच्यामधील शौल नावाच्या एक तरुणाचा प्रामुख्याने उल्लेख केला जातो. शौल जन्माने रोमी नागरिक आणि शिवाय एक कट्टर परोशी होता. त्याने गमलिएल नावाच्या मान्यवर गुरूकडून यहुदी धर्माचे रीतसर शिक्षण घेतले होते. स्तेफनावर दगडमार करून त्याला जेव्हा मारले गेले तेव्हा त्या कृत्यात शौलाचा आवेशी सहभाग होता. (प्रे.कृ. ७:५७-८:३, २२:३)

शौल ख्रिस्ती पुरुषांना आणि स्त्रियांनाही अटक करून तुरुंगात टाकत असे आणि त्यांना मरणाची शिक्षा व्हावी म्हणून प्रयत्न करत असे. तो श्रेष्ठ याजकाकडे गेला आणि त्याने दिमिष्कातल्या ख्रिस्ती लोकांना अटक करून यरुशलेमाला आणण्यासाठी परवानगी मिळवली. ती परवानगी घेऊन शौल निघाला, पण वाटेत निराळेच काही घडले.

•

शौल यरुशलेमहून प्रवास करीत दिमिष्काजवळ आला असता त्याच्या सभोवती आकाशातून अकस्मात् एक प्रकाश चमकला. शौल जमिनीवर पडला आणि त्याने एक आवाज ऐकला, “शौला, शौला, तू माझा छळ का करतोस?”

तेव्हा शौलाने विचारले, “प्रभू, तू कोण आहेस?”

आणि त्याला उत्तर ऐकू आले, “तू ज्याचा छळ करतोस तो नासोरी येशू मी आहे.”

शौल म्हणाला, “प्रभू, मी काय करू?”

आणि प्रभू म्हणाला, “ऊठ, आपल्या पायांवर उभा रहा. दिमिष्काला जा आणि तुझ्यासाठी, तू करावयात म्हणून, ज्या सर्व गोष्टी नेमलेल्या आहेत त्यांविषयी तुला तिथं सांगण्यात येईल. मी तुला दर्शन दिलं ते ह्यासाठी की, मी तुला सेवक आणि साक्षी नेमावं. मी ह्या प्रजेपासून आणि परजनांपासून तुला सोडवीन. त्यांच्याकडे मी आता तुला पाठवीत आहे, ते ह्यासाठी की, तू त्यांचे डोळे उघडावेस आणि अंधारातून प्रकाशाकडे, आणि सैतानाच्या सत्तेतून देवाकडे तू त्यांना वळवावंस. म्हणजे त्यांना पापांची क्षमा मिळून माझ्यावरील विश्वासानं पवित्र झालेल्या लोकांबरोबर वाटा मिळावा.”

येशूचा शौलाबरोबरचा संवाद हा पवित्र शास्त्रात नमूद केलेला येशूचा शेवटचा संवाद आहे. (प्रे.कृ. ९:१-६, २२:१-१०, २६:९-१८)

•

ही घटना नेमकी कधी घडली हे पवित्र शास्त्रात सांगितलेले नाही. पण येशूच्या स्वर्गारोहणानंतर अल्पावधीत ती घडली असावी असे मानायला हरकत नाही. तोच शौल पुढे पौल ह्या नावाने, मग येशूचा प्रेषित पौल म्हणून आणि नंतर संत पौल म्हणून ओळखला जाऊ लागला. नव्या करारातील २७ पुस्तकांपैकी १३ पुस्तके पौलाने

लिहिलेली आहेत. ती पौलाने ख्रिस्ती मंडळ्यांना आणि व्यक्तींना लिहिलेली पत्रे आहेत. तरुणपणी ख्रिस्ती लोकांचा छळ करणाऱ्या पौलाने त्याच्या नंतरच्या आयुष्यात स्वतः ख्रिस्तासाठी छळ सोसला. ख्रिस्ती तत्वज्ञानाविषयी आणि जीवनशैलीविषयी कोणाला माहिती हवी असेल तर त्याने संत पौलाची पत्रे वाचावीत. ख्रिस्तासारखे कसे जगायचे हे शिकायचे असेल तर ते पौलाकडून.

●

पवित्र शास्त्रात असे वर्णन केले आहे की, वधस्तंभावर येशूने मोठ्या आवाजात ओरडून प्राण सोडला, तेव्हा यरुशलेमाच्या मंदिरातील पवित्र स्थानातला पडदा वरपासून खालपर्यंत फाटून दुभागला, पृथ्वी कापली, खडक दुभंगले. तेथे उभ्या असलेल्या शतपतीने आणि त्याच्याबरोबर येशूवर पहारा करणाऱ्यांनी ते पाहिले तेव्हा तो शतपती म्हणाला, “हा खरोखर देवाचा पुत्र होता.” (मत्तय २७:५०-५४, मार्क १५:३७-३९)

एकदा येशूने स्वतःच आपल्या शिष्यांना विचारले होते की, मनुष्याचा पुत्र कोण आहे असे त्यांना वाटते. आणि त्याचा शिष्य शिमोन पेत्र त्याला म्हणाला होता, “तू ख्रिस्त, जिवंत देवाचा पुत्र आहेस.” (मत्तय १६:१३-२०)

“तू कोण आहेस?” हा येशूला पुन्हापुन्हा विचारला गेलेला एक प्रश्न आहे.  होता. कोणी त्याला यहुद्यांचा राजा मानीत. कोणाला वाटे की, तो एक संदेष्टा आहे. असंख्य लोक त्याच्या मागेमागे चालत जायचे. किती तरी लोक आपले आजार बरे करून घ्यायला त्याच्याकडे येत. पण “येशू कोण आहे?” ह्या प्रश्नाचे खरे उत्तर हे आहे की, “येशू जिवंत देवाचा पुत्र आहे.”

आजच्या काळातसुद्धा येशूला जाणून घ्यायचा प्रयत्न करणारे, त्याचा शोध घेणारे, पुष्कळ लोक आहेत. ज्यांना येशूची खरी ओळख पटते ते धन्य !

•